रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ४२
www.ramprahar.com
बुधवार, २८ ऑगस्ट २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

### अंतरंग
माथेरानच्या बोगद्यातून बनणार दिल्लीचा मार्ग/२
जोरदार पाऊस भातशेतीला ठरतोय पूरक/६
मुख्यमंत्र्यांकडून कशेडी भुयारी मार्गाची पाहणी/७

## जय शाह यांची आयसीसीच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड



**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (आयसीसी) सचिव जय शाह आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष झाले आहेत. नामांकन दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी मंगळवारी (दि.२७) इतर कोणी अर्ज न केल्याने जय शाह यांच्या अध्यक्षपदाचा मार्ग मोकळा झाला. जय शाह २०१९ मध्ये पहिल्यांदा बीसीसीआयचे सचिव बनले. त्यानंतर २०२२मध्ये दुसऱ्यांदा त्यांच्याकडे ही जबाबदारी आली. २०२५ मध्ये त्यांच्या या पदाचा कार्यकाळ संपुष्टात येणार होता. आयसीसीचे विद्यमान अध्यक्ष ग्रेग बार्कले यांचा कार्यकाळ ३० नोव्हेंबरला संपत आहे. त्यांच्यानंतर आता जय शाह अध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी म्हटले होते की, जय शाह यांनी या पदाची जबाबदारी स्वीकारल्यास जगभरातील क्रिकेटसाठी फायद्याचे ठरेल.

# गोविंदा रे गोपाळा! पनवेलच्या सोसायटीतील दहीहंडी जय महाराष्ट्र व्यायामशाळा मंडळाने फोडली





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोविंदा रे गोपाळा... यशोदेच्या तान्ह्या बाळा... अशा जयघोषात शहरातील सोसायटी मित्रमंडळाच्या वतीने दहीहंडी उत्सव साजरा झाला. या दहीहंडी उत्साहात मिडलक्लास हौसिंग सोसायटीमधील रहिवाशी उत्स्फूर्तपणे सहाभगी झाले. यामध्ये महिला आणि लहान मुलांचा उत्साह पाहण्यासारखा होता. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या दहीहंडी उत्सवात सहभागी होऊन हंडी फोडलेल्या मंडळांना तसेच लहान मुलांना सन्मानचिन्हं देऊन त्यांना प्रोत्साहित केले.

दहीहंडी दरम्यान वरुणराजाने हजेरी लावल्यामुळे बालगोपाळांचा आनंद द्विगुणीत झाला. सोसायटी मित्रमंडळाची हंडी फोडण्याचा मान जय महाराष्ट्र शिवतेज व्यायामशाळा मंडळ पनवेल कोळीवाडा यांना मिळाला. त्यांना भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित केले. या वेळी भाजपचे शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, उद्योजक राजू गुप्ते, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष सुमीत झुंझारराव, संदीप पाटील, अमोघ ठाकूर यांच्यासह मिडल क्लास हौसिंग सोसायटीमधील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाडकी बहीण योजनेला सरकारचे आणखी बळ

## महिला व बाल सशक्तीकरण योजनेतील राखीव निधीपैकी एक टक्का वापरणार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत सुधारणा करण्यासह व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. राज्य सरकारच्या महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार, जिल्हा वार्षिक योजनेतील महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी राखीव असलेल्या तीन टक्के निधीपैकी एक टक्के निधी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय आर्थिक वर्ष २०२४-२५साठी लागू असणार आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्य सरकारने सुरू केली आहे. राज्य सरकारकडून या योजनेद्वारे महाराष्ट्रातील पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत. या योजनेनुसार आतापर्यंत महाराष्ट्र सरकारने जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे मिळून तीन हजार रुपये दिले आहेत. ऑगस्टमध्ये ज्या महिलांनी अर्ज भरले आहेत त्यांना ३१ ऑगस्टला योजनेचे पैसे दिले जाणार आहेत.



### ३१ ऑगस्टला मिळणार पैसे

महाराष्ट्रात जुलै महिन्यात अर्ज केलेल्या एक कोटी आठ लाख पात्र महिलांना जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे तीन हजार रुपये देण्यात आले आहेत. ऑगस्टमध्ये अर्ज केलेल्या ४५ ते ५० लाख महिलांना ३१ ऑगस्टला तीन हजार रुपये दिले जाणार आहेत. याबाबतचा राज्यस्तरीय कार्यक्रम नागपूरमध्ये पार पडणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करणे, तांत्रिक अडचणींचे निराकरण करणे आदी बाबींसाठी लागणाऱ्या अतिरिक्त मनुष्यबळाचा खर्च तसेच इतर प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी महिला व बालविकास विभागाचा शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत महिला व बालविकास विभागास महिला व बाल सशक्तीकरण या योजनेसाठी राखीव असलेल्या तीन टक्के निधीपैकी एक टक्के निधी विशेष बाब म्हणून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत संबंधित जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेसाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे, तसेच उर्वरित दोन टक्के निधी संदर्भ क्रमांक १मधील शासन निर्णयातील तरतुदीनुसार खर्च करण्यात यावा, असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार हा खर्च करण्यात येणार आहे.

ऑगस्टमध्ये अर्ज केलेल्या महिलांना ३१ ऑगस्ट रोजी लाभ मिळणार आहे.

## मुंबईत गोविंदा पथकांच्या उत्साहाला पावसाचीही सलामी

**मुंबई :** 'गोविंदा रे गोपाळा', 'बोल बजरंग बली की जय' असा जयघोष करीत मुंबईसह राज्यभर दहीहंडी उत्सव पावसाच्या हजेरीत उत्साहात साजरा झाला.

मुसळधार पावसाच्या धारा आणि चिखलामुळे गोविंदा पथकांना मानवी मनोरे रचताना अडचणी येत होत्या, मात्र या अडचणींवर मात करीत गोविंदा मानवी मनोरे रचत होते. हा रोमहर्षक थरार अनुभवण्यासाठी नागरिकांनी हातात छत्री घेऊन ठिकठिकाणी गर्दी केली आहे.

## रायगडात पारंपरिक पद्धतीने दहीहंडी उत्सव साजरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि.२७) दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा झाला. गावागावात हदीहंड्या पहायला मिळाल्या, तर शहराठिकाणी राजकीय नेत्यांची पुरस्कृत केलेल्या लाखो बक्षिसांच्या दहीहंडीचे लोणी चाखण्यासाठी गोविंदा पथकांची कसरत अनुभवायला मिळाली.



यावर्षी जिल्ह्यात आठ हजार ५०९ दहीहंड्या लावण्यात आल्या होत्या. प्रायोजित दहीहंडीतील लाखोंच्या बक्षिसांचे लोणी फस्त करण्यासाठी गोविंदा पथकांनी जीवाची बाजी लावली. मागील महिनाभर केलेला सराव, घेतलेली मेहनत पणाला लावून मानवी मनोरे रचले. पावसाच्या हलक्या सरी बरसत होत्या.

श्रीकृष्ण जन्म सोमवारी पारंपरिक पद्धतीने साजरा झाला. जिल्ह्यात विठ्ठल-रखुमाई मंदिर, श्रीकृष्ण मंदिर आणि घराघरात जन्माष्टमीनिमित्त पोथी, भजन, कीर्तन झाले. उत्सवाला गालबोट लागू नये म्हणून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## निवडक

### नौदलाच्या अधिकाऱ्यांकडून राजकोट येथे पाहणी

**मालवण :** नौदलाच्या अधिकाऱ्यांनी राजकोट येथे कोसळलेल्या पुतळ्याची मंगळवारी (दि.२७) पाहणी केली. याबाबत लवकरच एक स्वतंत्र अहवाल तयार करण्यात येणार असून हा अहवाल नौदलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कोसळलेल्या शिवपुतळ्याची पाहणी केल्यानंतर नौदल अधिकाऱ्यांनी मंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा केली.

### महिला डॉक्टरवर रुग्णाचा हल्ला; घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

**तिरुपती :** येथील व्यंकटेश्वरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस रुग्णालयामध्ये एका रुग्णाने अचानक एका महिला डॉक्टरवर हल्ला केला. त्यामुळे रुग्णालयातील बाकीचे रूग्णही घाबरून गेले, मात्र या हल्ल्यानंतर रुग्णालयातील अलार्म वाजल्यामुळे वॉर्डातील इतर डॉक्टर आणि सहकारी मदतीला धावले आणि त्यांनी हल्लेखोर रुग्णाला पकडले.
हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

# विधानसभेची हंडी महायुतीच फोडणार!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून विजयाचा विश्वास

**ठाणे : प्रतिनिधी**

विरोधकांनी कतीही आरोप केले, कितीही रडगाणे गायले तरीसुद्धा विधानसभेची हंडी महायुतीच फोडणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. टेंभी नाका मित्र मंडळाच्या वतीने आयोजित दिघे साहेबांची दहीहंडी मानाची हंडी याठिकाणी मुख्यमंत्री शिंदे यांनी हजेरी लावली. त्या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आम्ही लाडकी बहीण, लाडका भाऊ, लाडका शेतकरी आणि आता लाडका गोविंदा आदींसह इतर अनेक योजना आणल्या आहेत, मात्र यामुळेच विरोधकांच्या पोटात दुखू लागले आहे. त्यामुळे ते सारखे आरोप करीत आहेत. आमचे सरकार आल्यानंतर सर्व सण, उत्सव हे निर्बंधमुक्त केले. गोविंदा आता प्रो गोविंदा केला, त्यांचा विमा काढला, मात्र प्रत्येक गोविंदाने हा खेळ खेळताना



काळजी घ्यावी, असे आवाहनदेखील त्यांनी या वेळी केले.

सिने अभिनेते गोविंदा यांनी या वेळी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यात जे काही काम केले. त्यामुळे पुन्हा एकदा भगवाराज येईल, असा विश्वास व्यक्त केला, तसेच कोणाला वाटलेही नव्हते की, ठाण्यातून मुख्यमंत्री होईल, मात्र एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाले. त्यामुळे आता त्यांनी केलेल्या कामाचा आवाज दिल्लीपर्यंत पोहचत आहे, असे सांगितले.

### अडीच वर्षांपूर्वी पापाची हंडी फोडली-उपमुख्यमंत्री फडणवीस

अडीच वर्षांपूर्वी आम्ही पापाची हंडी फोडून राज्यात एक पुण्याची हंडी उभारली, अशी टिका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर केली, तसेच २०२४मधील हंडी आम्हीच फोडणार असल्याचे सांगत त्यांनी विधानसभा निवडणूक जिंकणार असल्याचा विश्वासही व्यक्त केला.

# पश्चिम रेल्वे मार्गावर ३५ दिवसांचा ब्लॉक; ७०० लोकल फेऱ्या रद्द

**मुंबई : प्रतिनिधी**

पश्चिम रेल्वे मार्गावर मंगळवारपासून पुढचे ३५ दिवस मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. गोरेगाव ते कांदिवली रेल्वे स्थानकादरम्यान सहाव्या मार्गिकेच्या विस्तारासाठी पश्चिम रेल्वे मार्गावर हा मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. ६ ऑक्टोबरपर्यंत हा मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गावरील ७०० लोकल फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. प्रवासाचे नियोजन करूनच नागरिकांना ३५ दिवस प्रवास करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

पश्चिम रेल्वेवर घेण्यात येणाऱ्या ३५ दिवसांच्या ब्लॉक कालावधीमध्ये पाच दिवस १० तासांचा पॉवर ब्लॉक असणार आहे. या मेगाब्लॉक कालावधीमध्ये जवळपास ६७० ते ७०० लोकल फेऱ्या रद्द करण्यात येणार आहे. गोरेगाव ते कांदिवली सहाव्या मार्गिकेच्या कामासाठी विकेंडला पाच मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. या प्रत्येक मेगाब्लॉकला १३० ते १४० लोकलफेऱ्या रद्द करण्यात



येणार आहेत. हे मेगाब्लॉक १० तासांचे असणार आहेत.

गणेशोत्सवाच्या १० दिवसांच्या काळामध्ये गणेशभक्तांची गैरसोय टाळण्यासाठी कोणताही ब्लॉक घेण्यात येणार नाही. ११ ते १७ सप्टेंबर या कालावधीमध्ये सहाव्या मार्गिकेचे काम बंद ठेवण्यात येणार आहे, असे पश्चिम रेल्वेकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे गणेशभक्तांना काहीसा दिलासा मिळाला आहे. सध्या लांबपल्ल्यांच्या गाड्यांसाठी अप आणि डाऊन अशी एकच मार्गिका सुरू आहे. नागरिकांनी नियोजन करूनच प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पेणमध्ये नवनिर्वाचित खासदार धैर्यशील पाटील यांची विजयी मिरवणूक

**पेण : प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या वतीने भाजप रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांची वर्णी लागल्यानंतर सोमवारी (दि.२६) सायंकाळी भव्य मिरवणूक पेण शहरातून काढण्यात आली होती. या वेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

या मिरवणुकीत आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर माजी जि. प. सदस्य कौसल्या पाटील, माजी जि.प.अध्यक्ष निलीमा पाटील, माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष



अविनाश कोळी, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, गटनेते अनिरूद्ध पाटील, ललित पाटील, राजेश मपारा, शोमेर पेणकर, माजी सभापती प्रफुल्ल म्हात्रे आदींसह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजप कार्यालय येथून निघालेल्या या मिरवणुकीत कार्यकर्त्यांनी डिजेच्या तालावर ठेका धरत आपला आनंद साजरा केला. या वेळी उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनीही या वेळी कार्यकर्त्यासोबत ठेका धरला.

ही मिरवणूक पेण नाका, गांधी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौकमार्गे नेण्यात आली. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास खासदार धैर्यशील पाटील व उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. खासदार धैर्यशील पाटील यांच्या वाक्रुळ गावीही भव्य मिरवणूक काढण्यात आली. सर्व कार्यकर्ते व नागरिकांचे खासदार धैर्यशील पाटील यांनी पाठिंब्याबाबत आभार मानले.

# छत्रपती शिवरायांचा १०० फूट उंच पुतळा पुन्हा उभारू -ना. केसरकर



**मालवण : प्रतिनिधी**

मालवण राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. या घटनेचे दुःख निश्चित मनामध्ये आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून छत्रपती शिवाजी महाराज यांचा १०० फूट उंचीचा पुतळा पुन्हा उभारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी मालवण येथे मंगळवारी (दि. २७) पत्रकार परिषदेत सांगितले.

मंत्री दीपक केसरकर यांनी राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाची पाहणी केली. या वेळी शिवसेनेचे तालुकाध्यक्ष राजा गावकर, बबन शिंदे, किसन मांजरेकर, ऋत्विक सामंत, सोनाली पाटकर आदी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, राज्य सरकारकडून अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचे काम सुरू होते, मात्र तांत्रिक अडचणींमुळे थांबले आहे. महाराष्ट्रातील उंच पुतळा मालवणात उभारला जावा, ही शिवप्रेमींची इच्छा आहे. नेव्हीला विश्वासात घेऊन पुन्हा छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभे झाले, तर आकर्षणाचे केंद्र ठरेल आणि हिच महाराजांना आदरांजली ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

# पीएम मोदींची व्लादिमीर पुतिन यांच्याशी चर्चा

## रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी पुढाकार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलिकडेच युक्रेनचा दौरा केला होता. त्या दौऱ्यात रशिया-युक्रेन युद्धावर चर्चा झाली. विशेष म्हणजे दौऱ्यावरून पंतप्रधान मोदी युद्ध थांबवण्यासाठी पुढाकार घेणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. आता याबाबत एक महत्त्वाची अपडेट आली आहे. पीएम मोदींनी मंगळवारी (दि.२७) रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी फोनवर चर्चा केली आहे.

पीएम मोदींनी सोशल मीडियाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, या दोन्ही नेत्यांमध्ये रशिया आणि युक्रेनमधील युद्धाबाबत चर्चा झाली. भारत शांततेच्या मार्गाने तोडगा काढण्यासाठी कटिबद्ध असल्याचे पीएम मोदींनी पुतिन यांना सांगितले. याशिवाय, विशेष धोरणात्मक भागिदारी आणखी मजबूत करण्यासाठीच्या दिशेने काय पाउले टाकता येतील, यावरही चर्चा करण्यात आली. यावरून असे दिसून येत आहे की, पीएम मोदी रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्यासाठी पुढाकार घेत आहेत.

## निवडक

### कोप्रोली येथून तरुणी बेपत्ता



पनवेल : राहत्या घरातून ऑफिसला जाते असे सांगून घराबाहेर पडलेली एक तरुणी अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मयुरी संजय भुरे (१८ रा.कोप्रोली) असे या तरुणीचे नाव असून रंग गोरा, उंची पाच फुट दोन इंच, अंगाने मध्यम, डोळे काळे, केस मध्यम लांब, चेहरा उभट, नाक सरळ असून अंगात काळा टॉप व जिन्स पॅन्ट, पायात बुट सोबत मोबाईल फोन आहे. या तरुणीबाबत कोणाला माहिती असल्यास त्यांनी तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा पो.हवा.होलगिर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बॅटऱ्या चोरणारा पोलिसांच्या ताब्यात

पनवेल : बॅटऱ्यांची चोरी करणाऱ्या आरोपीस तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तळोजा येथील पेठालीह मेट्रो सेंटरच्या बाहेरील सार्वजनिक पार्कींगच्या उभ्या करून ठेवण्यात येणाऱ्या मोटरसायकलच्या बॅटर्या चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलिसांनी झैब मोहम्मद हनीफ हतीफ याला ताब्यात घेवून त्याच्याकडून आतापर्यंत सात चोरीच्या बॅटर्या हस्तगत केल्या आहेत. त्याच्या अटकेमुळे अजूनही काही बॅटऱ्यांच्या चोरीची प्रकरणे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### दौंडकर व भटे यांना पदोन्नती

पनवेल : तुर्भे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर व वरिष्ठ निरीक्षक मधुकर भटे यांना महाराष्ट्र शासनातर्फे उपविभागीय उपअधिक्षक म्हणून पदोन्नती मिळाल्याने त्यांचे पोलीस वर्गाकडून अभिनंदन करण्यात येत आहे. तुर्भे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र रंगनाथ दौंडकर यांना पदोन्नती त्यांची आता उपविभागीय पोलीस अधिकारी रोहा उपविभाग, जि.रायगड येथे बदली करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वरिष्ठ निरीक्षकमधुकर वामनराव भटे यांनासुद्धा पदोन्नती मिळून त्यांची पोलीस उपअधिक्षक मुख्यालय बारामती, पुणे ग्रामीण येथे बदली करण्यात आली आहे.

### पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधन

पनवेल : बजरंग दल -मातृशक्ती- दुर्गा वाहिनी पनवेल प्रखंड तर्फे पनवेल येथे पनवेल पोलीस स्टेशन, पनवेल तालुका पोलीस स्टेशन तसेच तळोजा पोलीस स्टेशन येथे मातृशक्ती व दुर्गा वाहिनीच्या कार्यकर्त्या यांनी पोलीस बांधव पोलीस अधिकारी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरी केली. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मातृशक्ती व दुर्गा वाहिनीच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# माथेरानच्या बोगद्यातून बनणार दिल्लीचा मार्ग

## महाराष्ट्रात बनतोय जगातील सर्वांत लांब महामार्ग

**मुंबई : प्रतिनिधी**

जगातील सर्वांत लांब महामार्ग आपल्या भारतात बनत आहे. दिल्ली ते उरणच्या जेएनपीटी बंदरास जोडणारा असा हा १३५० किमीचा मार्ग आहे. यासाठी माथेरानच्या इको सेन्सेटिव्ह झोनच्या डोंगररांगातून ४.३९ किमीचा आठ पदरी बोगदा तयार करण्यात येत आहे. माथेरानच्या बोगद्यातून मुंबई दिल्ली असा प्रवास होणार आहे. माथेरानच्या डोंगराखालून दिल्लीचा बोगदा निघणार आहे. या महामार्गामुळे मुंबईतून १२ तासात दिल्ली गाठता येणार आहे.

पनवेलजवळ माथेरानच्या पायथ्याशी मोरबे गावापासून हा बोगदा सुरू होणार आहे. ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथनजीकच्या भोज गावाजवळ हा बोगदा संपेल. पर्यावरण खात्याची परवानगी मिळाल्यानंतर या बोगद्याचे काम सुरू झाले आहे. नॅशनल हायवे अॅथॉरिटीने इरकॉन कंपनीला या बोगद्याच्या बांधकामाचं कंत्राट देण्यात आले आहे. या बोगद्याच्या निर्मीसाठी एक हजार ४५३ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. यामुळे दिल्ली-मुंबई रस्त्याचं अंतर २४ तासांवरून १२ तासांवर येणार असून, हा ग्रीनफिल्ड एक्स्प्रेस-वे आठ पदरीचा आहे. त्यावर एक लाख कोटी खर्च करण्यात येणाराय.



बदलापूर ते पनवेल अंतर अवघ्या १५ मिनीटात पार करता येणार आहे. जेएनपीटी वडोदरा महामार्गातील बोगद्याचे काम प्रगतीपथावर आहे. माथेरानच्या पर्वतरांगामधून जाणाऱ्या या बोगद्याचे काम २०२५ला पूर्ण होणार आहे. यामुळे बदलापूर आणि पनवेलकराचा प्रवास सुपरफास्ट होणार आहे. बदलापूर शहरातून जाणाऱ्या जेएनपीटी वडोदरा या महामार्गात येणाऱ्या बोगद्याचे काम २५ टक्के पूर्ण झाले आहे. मुंबई-वडोदरा-जेएनपीटी बंदराला जोडणारा प्रस्तावित महामार्ग ठाणे जिल्ह्यातल्या अंबरनाथ तालुक्यातून जात आहे. या महामार्गामुळे बदलापूर शहराला भविष्यात बडोदा आणि जेएनपीटीची थेट कनेक्टिव्हीटी मिळणार आहे. यामुळे हा अत्यंत महत्वकांक्षी प्रकल्प मानला जात आहे. बदलापूरहून पनवेल तालुक्यात जाण्यासाठी माथेरानच्या पर्वतरांगातून बोगदा खोदला जात आहे.

लवकरच वसई ते ठाणे अतिवेगवान प्रवास होणार आहे. ठाण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि ठाणे, वसई, विरार, मीरा, भाईंदर प्रवास अतिवेगवान करण्यासाठी आता 'एमएमआरडीए'ने भुयारी बोगदा बांधण्याचा निर्णय घेतला आहे. वसई, फाऊंट हॉटेल नाका ते गायमुख, ठाणे असा बोगदा बांधण्यात येणार आहे. तर फाऊंटन हॉटेल ते भाईंदर असा उन्नत रस्ताही बांधण्यात येणार आहे. या दोन्ही प्रकल्पांना जवळपास २० हजार कोंटींचा खर्च येणार आहे. यामुळे घोडबंदर इथल्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटेल. बोगदा चार मार्गिकांचा असणार असून उन्नत रस्ता सहा मार्गिकेचा असणार आहे.

## माथेरानमधील पथदिवे उजळले

### दैनिक रामप्रहरच्या बातमीची दखल

**माथेरान : प्रतिनिधी**

मागील काही महिन्यांपासून माथेरान शहरातील पथदिवे जे बंद अवस्थेत होते ते आता उजळण्यास सुरवात झाली आहे. पथदिवे बंद बाबत दैनिक रामप्रहर वृत्तपत्राच्या बातमीने पालिकेचे लक्ष वेधले होते. त्या बातमीची दखल घेत पालिकेने अनेक विभागातील पथदिवे दुरुतीचे काम सुरू केले आहे.



पावसाळी पर्यटन हंगामात माथेरान शहराचे पथदिवे बंद अवस्थेत होते. याचा नाहक त्रास पर्यटकांसह नागरिकांना देखील होत होता. याबाबत स्थानिक नागरिकांनी समाज माध्यमांवर तक्रार करून पालिकेचे डोळे खोलण्याचा प्रेयत्न केला, मात्र पालिके कडून कोणतीही कारवाई झाली नाही. अखेर सोमवारी (दि. २६) दै. रामप्रहरमध्ये पथदिवे बंद असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. या बातमीची दखल घेत माथेरान नगर पालिकेने तात्काळ पथदिवे दुरुतीची कामे सुरू केली आहेत.

यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज नगर, पंचवटी नगर, वाल्मिक नगर, संत रोहिदास नगर याठिकाणी पालिका कर्मचाऱ्यांनी पथदिव्यांची तपासणी करून बंद अवस्थेत असलेले पथदिवे दुरुस्त केले. त्यामुळे ऐन सणासुदीच्या काळात माथेरानवासीयांना पथदिवे उजळलेले दिसणार आहेत.

## वावे मोहल्ला शेकाप कार्यकर्ते शिवसेनेत दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील शेतकरी कामगार पक्ष सध्या शिवसेनेच्या रडारवर असून बोरघर पाठोपाठ वावे मोहल्ला येथील शेकापक्ष कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये जाहिर प्रवेश केला. या प्रवेशावेळी महाडचे आमदार भरत गोगावले यांनी प्रवेशकर्त्यांचे स्वागत केले. प्रवेशकर्त्यांनी आमदार गोगावले यांना सलग चौथ्यावेळी आमदार करण्यासाठी झटणार असल्याचा शब्द दिला आहे.

पोलादपूर तालुक्यातील वावे मोहल्ल्यातील तरुणांनी शेतकरी कामगार पक्षाला सोडचिठ्ठी देत आमदार गोगावले यांच्या कार्यक्षमतेवर प्रभावित होत महाड विधानसभा मतदारसंघातून आमदार गोगावले यांना सलग चौथ्यांदा बहुमताने विजयी करण्यासाठी शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला. वावे मोहल्ल्यातील युवा नेतृत्व अबरार करबेलकर व अहमद जुवले यांच्या नेतृत्वाखाली शेखसाद करबेलकर, सैफुल्ला करबेलकर, महंमद तांबे, महंमद काझी, फय्याज काझी, समीर तांबे, जाहीद काझी, अब्दुल रेहमान करबेलकर, मुफीद ओमर, आतिफ तांबे, फहद जुले, अफान मुकादम, महंमद करबेलकर आदी शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आमदार भरत गोगावले यांच्या उपस्थितीत शिवनेरी निवासस्थानी शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला.

या वेळी शिवसेना उपतालुकाप्रमुख शौकत तारलेकर, हर्षल सातपुते, संकेत म्हस्के, सुरज वाळणकर यांच्यासह सवाद-धारवली विभागातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.



## ब्राह्मण मंडळातर्फे रोह्यात दहीहंडी

**रोहा : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील रोहा गावात ब्राह्मण मंडळातर्फे दहीहंडीचा उत्सव पावित्र्य, मांगल्य जपत साजरा करण्यात आला. ब्राह्मण मंडळातर्फे रोह्यात चार/सहा ठिकाणी दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला.

दहीहंडीच्या उत्सवातील पावित्र्य, मांगल्य आणि परंपरा आता हरवली आहे. दहीहंडीचा 'इव्हेंट' झाला असून त्याला ओंगळ स्वरूप प्राप्त झाले आहे, मात्र आजही कोकणातील अनेक गावांमध्ये दहीहंडी उत्सवाची परंपरा, पावित्र्य जपून उत्सव उत्साहात साजरा केला जातो. इथे उंचीची स्पर्धा नसते, कानठळ्या बसविणाऱ्या डीजेच्या भींती नसतात की अचकट विचकट गाणी व नाचही होत नाहीत.

ब्राह्मण मंडळातर्फे परंपरा जपत दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. दोन ठिकाणच्या हंड्या महिला आणि मुलींनी फोडल्या. बटाटा पोहे, वालाची उसळ, खारातील मिरची आणि गोड गोड शिरा अशा पारंपरिक नाश्त्याने या सार्वजनिक दहीहंडी उत्सवाची सांगता झाली. आबालवृद्ध या उत्सवात सहभागी झाले होते.

दरम्यान, ब्राह्मण मंडळातर्फे प्रत्येक सण उत्साहात साजरा करण्यात येतो.

## खालापुरातील भाजप आक्रमक

### अजित पवारांच्या राष्ट्रवादीला गंभीर इशारा

**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉँग्रेसचे (अजित पवार गटाने) खालापूर पोलीस स्टेशनवर काढलेल्या निषेध मोर्च्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. यामुळे खालापुरातील भाजप आक्रमक झाली असून राष्ट्रवादीचा कॉँग्रेसचा निषेध व्यक्त करून गंभीर इशारा दिला आहे.



राष्ट्रवादीच्या आंदोलनात भाजपचा काहीही संबंध नसतानाही राष्ट्रवादीच्या एका प्रतिष्ठीत पदाधिकाऱ्याने पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्र्यांच्याविरोधात घोषणा दिल्या. याचा निषेध म्हणून भाजपने पत्रकार परिषद घेत याला जोरदार उत्तर दिले असून महायुती टिकवायची असेल तर अशी बेताल व्यक्तव्य करणे बंद करा अन्यथा आम्हालाही जशास तसे उत्तर देण्यात, असा गंभीर इशारा दिला आहे.

या वेळी भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष सनी यादव, उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, कर्जत विधानसभा युवा मोर्चा अध्यक्ष प्रसाद पाटील, खालापूर तालूका सरचिटणीस रवींद्र पाटील, शिरवली ग्रामपंचायत सदस्य संदीप मोरे, खालापूर तालूका युवा मोर्चा अध्यक्ष नागेश पाटील, उपाध्यक्ष खालापूर तालूका प्रसाद देशमुख खालापूर तालूका चिटणीस विलास रसाळ, युवा मोर्चा चिटणीस महेश कड्ू, कामगार आघाडी चिटणीस दत्ताराम पाटील, सरचिटणीस खालापूर तालूका युवा मोर्चा विशाल लोते, उपाध्यक्ष मयूर पाटील, मनीष पाटील, नयन पाटील, नवीन देशमुख, प्रदीप पिंगळे, अंकुश पोळेकर, अनुप शिंदे, आशिष खराटे, नरेश रसाळ आदी उपस्थित होते.

## नवी मुंबईत गोपाळकाला उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत ५९ ठिकाणी सार्वजनिक दही हंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या शिवाय नवी मुंबईतील अनेक गावांमध्ये कृष्ण जन्म होताच थर लावत हंडी फोडण्यात आली. तर अनेक सोसायट्यांनी देखील त्यांच्या प्रांगणात दही हंडीचे आयोजन केले होते. ऐरोली विजय चौगुले यांची ११ लाख ११ हजार १११ रुपयांची एकूण पारितोषिके असणारी हंडी लक्षवेधी ठरली. या उत्सवात लावणी फेम गौतमी पाटील तसेच अभिनेत्री सई ताम्हणकर यांची विशेष उपस्थिती दिसून आली. त्यामुळे नागरिकांनीदेखील गर्दी केली होती.



नवी मुंबईत गेले दोन ते तीन दिवस पावसाची संततधार सुरू आहे. गोपाळकाल्याच्या दिनीदेखील पावसाची संतत धार दिसून आली. त्यामुळे गोविंदा पथकांनी नैसर्गिक पाण्यात भिजण्याचा आनंद घेतला. या निमित्ताने मंडळांकडून गोविंदा पथकांना भिजवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शेकडो लिटर पाण्याची बचत झाल्याचे दिसून आले. यात डोळ्यावर पट्टी बांधून हंडी फोडणे, वर अडकवलेली हंडी डोक्याने फोडणे असे खेळही सोसायटीमध्ये साजरे करण्यात आले. या वेळी कोपरखैरणे सकल मराठा समाजातर्फे यंदा प्रथमच मराठा आरक्षण हंडीचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाला केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी भेट दिली. तर आमदार मंदा म्हात्रे, आ. गणेश नाईक, माजी आमदार संदीप नाईक, मनसे शहराध्यक्ष गजानन काले तसेच शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी विविध मंडळांना भेटी दिल्या.

## कुंडेगाव कोळीवाडा येथील हरिनाम सप्ताह उत्साहात; शंभर वर्षांपासूनची परंपरा

**उरण : बातमीदार**

जसे जसे कृष्णाअष्टमी, गोपाळकाला सण जवळ येतात तसे तसे उरण मधील भाविक भक्तांना हरीनाम सप्ताहाची ओढ लागते. कारण श्रीकृष्ण जयंतीच्या सहा दिवस अगोदर उरणमध्ये अनेक ठिकाणी हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते.

अखंड हरीनाम सप्ताह मध्ये भजन, कीर्तन, भक्ती गीत गायन, महाप्रसाद, आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. उरण मधील नवघर ग्रामपंचायत हद्दीतील कुंडेगाव कोळीवाडा येथेही हरीनाम सप्ताहचे दरवर्षी उत्साहात आयोजन करण्यात येते. कुंडेगाव कोळीवाडा येथे हरिनाम सप्ताह साजरा करण्याची गावाला १०० वर्षाची ऐतिहासिक व धार्मिक परंपरा आहे. उरण तालुक्यातील नवघर ग्रामपंचायत हद्दीतील कुंडेगाव कोळीवाडा येथे वर्षानुवर्षे हरीनाम सप्ताह चालत आलेला आहे. यंदा २० ऑगस्ट २०२४ रोजी कुंडेगाव कोळीवाडा येथे हरीनाम सप्ताह चालू झाले असून २६ ऑगस्ट २०२४ रोजी या हरीनाम सप्ताहाची सांगता झाली आहे.

दरवर्षी सप्ताहात सहभागी होणारे भाविक भक्त, विविध देणगीदार, सल्लागार मंडळ, अखंड हरीनाम सप्ताह कमिटी, पंच कमिटी, व्यवस्थापक मंडळ, ग्रामस्थ मंडळ यांच्या सहकार्याने कुंडेगाव कोळीवाडा येथे हरिनाम सप्ताह होतो. यंदाचे हरिनाम सप्ताह यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष प्रमोद पाटील, उपाध्यक्ष काशिनाथ पाटील, सचिव रत्नाकर पाटील, सचिव महावीर पाटील, तसेच सल्लागार मंडळ, पंच कमिटी, व्यवस्थापक मंडळाचे पदाधिकारी सदस्य, ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.



## महाडमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप



**उरण : बातमीदार**

सामाजिक कार्यकर्ते दिवंगत रामचंद्र सखाराम पवार यांच्या तृतीय स्मृती दिनाचे औचित्य साधून उरण मधील सामाजिक कार्यकर्ते विजय रामचंद्र पवार, संजय पवार यांच्या माध्यमातून भेलोशी पंचक्रोशी माध्यमिक विदयालय तालुका महाड येथे वत्सला रामचंद्र पवार यांच्या हस्ते गोर गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दप्तर व वह्या, पाण्याची बाटली, पेन किट आदी शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. यासोबतच स्वराज्य निवारा आश्रम राजेवाडी महाड येथे बेड पलंग व अन्न धान्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी बौधजन पंचायत समिती शाखा क्रमांक ४०, स्थानिक भेलोशिकर भावकी मुंबई मंडळ, महिला मंडळ व तरुण मित्र मंडळ भेलोशीचे पदाधिकारी सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते. वडिलांच्या स्मृतीदिनी गोर गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक कार्यकर्ते विजय पवार, संजय पवार यांनी एक चांगला आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

# नायजेरीयन महिला पोलिसांच्या ताब्यात

## ◆ महिलेचे प्रसंगावधान; ४३ लाखांचे अंमली पदार्थ हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

उलवे भागात राहणाऱ्या महिलेच्या प्रसंगावधानामुळे अंमली पदार्थाची विक्री करण्याच्या प्रयत्नात असलेली नायजेरीयन महिला पोलिसांच्या जाळ्यात अडकल्याची घटना उघडकीस आली आहे. आलीशा केम (वय २५) असे या नायजेरीयन महिलेचे नाव असून तिच्याकडे तब्बल ४३ लाख रुपये किंमतीचे कोकेनच्या कॅप्सुल सापडल्याने न्हावा-शेवा पोलिसांनी तिला एनडीपीएस ॲक्टनुसार अटक केली आहे. या महिलेने हे कोकेन कुठून आणले? तसेच ते कोणाला विक्री करणार होती? याचा पोलिसांकडुन तपास करण्यात येत आहे.

उलवे, सेक्टर-१७ मध्ये राहणाऱ्या शमशाद बेगम या सीबीडी-बेलापूर येथून रिक्षाने उलवे येथे आल्या होत्या. त्यानंतर त्या आपली पर्स रिक्षामध्ये विसरुन घरी निघून गेल्या. या वेळी आरोपी नायजेरीयन महिला आलीशा केम या रिक्षामध्ये बसून निघून गेली. काही वेळानंतर शमशाद बेगम यांना त्यांची पर्स रिक्षामध्ये विसरल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी रिक्षाची शोधा-शोध सुरू केली. यादरम्यान नायजेरीयन महिला पुन्हा ती रिक्षा घेऊन त्याच ठिकाणी आली असता, शमशाद बेगम यांनी नायजेरीयन महिलेकडे आपल्या पर्सबाबत चौकशी केली, मात्र तिने टाळाटाळ करण्यास सुरुवात केली तसेच शमशाद बेगम यांना धक्का देऊन तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शमशाद बेगम यांनी आरडा-ओरड करून आपल्या पर्ससाठी नायजेरीयन महिलेचा पाठलाग सुरू केला. त्यामुळे नायजेरीयन महिलेला पकडण्यासाठी काही नागरिक आणि महिला पुढे आल्या. त्यामुळे नायजेरीयन महिला तेथील फर्निचरच्या दुकानात घुसल्याने दुकान मालकाने या प्रकाराची माहिती पोलिसांना दिल्यानंतर न्हावा-शेवा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

> **अटकेतील नायजेरीयन महिला तिच्याजवळ असलेले अंमली पदार्थ विक्री करण्याच्या प्रयत्नात होती, मात्र शमशाद बेगम या महिलेमुळे तिचा प्रयत्न फसला. त्यामुळे तिने तिच्याजवळ असलेले अंमली पदार्थ टावून पळण्याचा प्रयत्न केला असता, तिला शमशाद बेगम आणि इतरांच्या मदतीने पकडण्यात यश आले. नायजेरीयन महिलेकडून ४३ लाख रुपये किंमतीचे कोकेनचे कॅप्सुल हस्तगत करण्यात आले आहेत.**
>
> **-अंजुम बागवान, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, न्हावा-शेवा पोलीस ठाणे**

पोलीस आल्याचे लक्षात आल्यानंतर नायजेरीयन महिलेने तिच्याजवळ असलेले अंमली पदार्थ असलेली पर्स दुकानातील शौचालयात टाकून पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र शमशाद बेमग आणि पोलिसांनी नायजेरीयन महिलेला अडवून धरत तिने टावून दिलेल्या पर्सची तपासणी केली. त्यावेळी त्यात ४३ लाख रुपये किंमतीचे कोकेनच्या कॅप्सुल आढळून आल्या. त्यानंतर पोलिसांनी नायजेरीयन महिला आलीशा केम हिला ताब्यात घेतले.

# खारघरच्या इस्कॉन मंदिरात जन्माष्टमी

## आमदार प्रशांत ठाकूर यांची लाभली उपस्थिती





**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील गोल्फ कोर्स समोरील इस्कॉन इंटरनॅशनल या मंदिर परिसरात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. एकूण नऊ दिवस चालणाऱ्या या जन्माष्टमी उत्सवाच्या नवव्या दिवशी कृष्णाच्या जन्माने पूर्ण झाला.

या वेळी जन्माष्टमीच्या दिवशी मध्यरात्री श्री कृष्णाचा महाअभिषेक हे या उत्सवाचे मुख्य आकर्षण होते. या वेळी श्री कृष्णाचे भक्त मोठ्या संख्येने या मंदिरात जमले होते. दरम्यान या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनीही भेट देत श्रीकृष्णाचे व इस्कॉन मंदिराचे संस्थापक ए.सी. भक्ती वेदांत श्री प्रभु पाद यांचे यांच्या मुर्तीचे दर्शन घेतले.

या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, भाजप युवा मोर्चा रायगड जिल्हा सचिव शुभ पाटील, मंदिर अध्यक्ष सुरदार प्रभु, पीआरओ महेश पारेख आदी उपस्थित होते.

# कळंबोलीत पुन्हा जलमापकांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

सिडकोच्या जलवाहिन्यांवर बसविण्यात आलेले जलमापके चोरी होत असल्याने काही महिन्यांपूर्वी बालकांना कळंबोली पोलिसांनी ताब्यात घेतले होते. या घटनेनंतर जलमापकांची चोरी थांबली होती, मात्र पुन्हा एकदा कळंबोली येथील सिडको मंडळाच्या पाणी विभागाच्या कार्यालयात रहिवाशी जलमापके चोरी होण्याच्या तक्रारीत वाढ झाली आहे.

कळंबोली येथील बैठ्या चाळींमध्ये (एल. आय. जी.) जलवाहिनीवर सिडको मंडळाने बसविलेली जलमापके दिवसाला ८ पेक्षा अनेक चोरली जात असल्याने रहिवाशी वैतागले आहेत. नेमके कोण चोरी करतो यासाठी काही जागरुक नागरिक व गृहिणींनी पाळत ठेवली तरी जलमापकांची चोरी होत आहे.

चोर न सापडल्याने रहिवाशांनी सिडकोच्या कार्यालयातील पाणीपुरवठा विभागात येऊन लेखी तक्रारी दिल्या आहेत. यापूर्वी जलमापके चोरी जात असल्याने हे प्रकरण पोलीस ठाण्यात गेले होते. पोलिसांनी पाळत ठेऊन काही बालकांना या प्रकरणात ताब्यात घेतले होते.

संबंधित बालकांचा एक गट भंगार व्यावसायिकाला चोरी केलेले जलमापके विक्री करत असल्याची ध्वनीचित्रफीतसुद्धा समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झाली होती. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणी लक्ष देण्याची मागणी रहिवाशांकडून होत आहे.

# पनवेलमध्ये विद्यार्थी सुरक्षा आणि व्यवस्थापनाच्या भूमिकेवर कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सुरक्षा विषयक उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणीसाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार विद्यार्थी सुरक्षा व व्यवस्थापनाची भूमिका याबाबतची कार्यशाळा गुरुवारी (दि. २९) सकाळी साडे नऊ वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरीक्त आयुक्तभारत राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा होता आहे. बदलापूर येथे घडलेल्या अनुचित घटनेच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत शासन निर्णयानुसार महापालिकेचे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेमध्ये अतिरीक्त सरकारी अभियोक्ता, स्थानिक पोलीस प्रशासन, शाळा व्यवस्थापन प्रतिनिधी व शिक्षण विभागातील अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

या वेळी पोक्सो अधिनियम व त्यामधील तरतूदी, शाळा व्यवस्थापन (संस्था, मुख्याध्यापक व व्यवस्थापन समिती) यांच्या विद्यार्थ्यांच्या संबधीच्या जबाबदाऱ्या, पोक्सो अधिनियम अंतर्गत दाखल होणारे गुन्हे व कार्यपध्दती, विद्यार्थी सुरक्षतेच्या दृष्टीने शाळा व्यवस्थापनाने करावयाच्या उपाय योजना व २१ऑगस्ट २०२४ रोजीच्या शासन निर्णय अंमलबजावणी व शाळांनी स्थापन करावयाच्या विविध समित्या यांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्वाची असल्याने या कार्यशाळेस महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व खासगी शाळांचे संस्थाचे अध्यक्ष अथवा सचिव, सर्व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सर्व खाजगी अनुदानीत, अशंतः अनुदानीत, विना अनुदानीत, स्वयं अर्थ सहाय्यित शाळांचे मुख्यध्यापक, प्राचार्य, सर्व माध्यमे, सर्व व्यवस्थापनाच्या (प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक) सर्व बोर्डाच्या शाळांनी उपस्थित राहावे अशा सूचना महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# लाडकी बहीण योजनेच्या पात्र महिलांना साड्यांचे वाटप

## आमदार महेश बालदी यांच्यातर्फे रक्षाबंधन भेट



**उरण : वार्ताहर**

जसखार गावात रविवारी (दि. २५) भारतीय जनता पक्ष जसखार यांच्यामार्फत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत पात्र झालेल्या महिला - भगिणींसाठी आमदार महेश बालदी यांच्याकडून खास रक्षाबंधन साडी भेट म्हणून देण्यात आली.

कार्यक्रमासाठी भारतीय जनता पक्षाच्या रायगड जिल्हाच्या महिला मोर्चाच्या उपाध्यक्षा संगीता प्रशांत पाटील, शिवसेनेच्या शिंदे गटाच्या रायगड महिला उपजिल्हा प्रमुख वैजयंती ठाकूर, शिवसेना उरण शिवसेना उपतालुका प्रमुख अमित ठाकूर, उरण तालुकाप्रमुख प्रणाली म्हात्रे, जसखार गावचे माजी सरपंच दामोदर घरत, जसखारचे माजी अध्यक्ष उमेश पारवे, वैभव सामाजिक संस्थाचे अध्यक्ष वैभव ठाकूर व शिवसेनेच्या प्रीती ठाकूर, भाजपचे जसखार गावचे अध्यक्ष अक्षय घरत, ग्रामपंचायतच्या सदस्या हेमलता ठाकूर, दमयंती म्हात्रे, सीमा घरत, गोरक्षनाथ घरत आदी भाजप व शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमला मोठ्या प्रमाणात महिलांनी उपस्थिती लावली व रक्षाबंधन भेट स्वीकारली.





**खारघर : येथील श्री संत सेवालाल महाराज सामाजिक ट्रस्टच्या वतीने बंजारा समाज तिज उत्सव आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. आयोजकांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, भाजप युवा मोर्चा रायगड जिल्हा सचिव शुभ पाटील आदी उपस्थित होते.**

# उरण येथे दहीहंडी उत्सवाचा जल्लोष

**उरण : वार्ताहर**

उरण शहर सह ग्रामीण भागात श्री कृष्ण जयंती व गोपाल काला उत्सव मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा करण्यात आला.उरण तालुक्यातील व शहरातील अनेक गोविंदा पथकाने विविध ठिकाणी व अनेक पक्षांनी बांधलेल्या दही हंड्या फोडून आनंदोत्सव साजरा केला. दही हंड्यांना बक्षिसे व सन्मान चिन्ह देवून विजेत्या गोविंदा पथकांचा सन्मान करण्यात आला.

उरण शहरातील पेंशनर पार्क समोरील उरण नगर परिषदेचे महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्मधिकारी शाळेच्या प्रांगणात महेश बालदी मित्र मंडळ व आमदार महेश बालदी यांच्या वतीने दहीहंडी उत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले होते.

उरण तालुक्यातून सुमारे ३० गोविंदा पथकांनी या दही हंडीस हजेरी लावली होती. सहाव्या थारासाठी रुपये ५०००, रुपये व सन्मान चिन्ह देवून सन्मान करण्यात आला. तर सातव्या थरास रूपये एकरा हजार रूपये व् सन्मान चिन्ह आमदार महेश बालदी व मान्यवरांच्या हस्ते गोविंदा पथक यांना सन्मानित करण्यात अले .



उरण नगर परिषद हद्दीतील मोरा येथील साई माऊली गोविंदा पथक यांनी दहीहंडी फोडून मान मिळविला या गोविंदा पथकास बक्षीस व सन्मान चिन्ह देवून सन्मानित करण्यांत आले. राघोबा देव गोविंदा पथक, साई माऊली गोविंदा पथक, होनेश्वर गोविंदा पथक आवरे, द्रोणागिरी साई गोविंदा पथक, करंजा, वाघेश्वर गोविंदा पथक पिरकोन, श्री गणेश गोविंदा पथक कुंडेगाव अशा एकूण ३० गोविंदा पथकांनी हजेरी लावली होती.

या वेळी आमदार महेश बालदी, पनवेल परिमंडळचे डीसीपी प्रशांत मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त (पोर्ट विभाग) डॉ.विशाल मेहुल, उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र मिसाळ, पोलीस निरीक्षक सुर्यकांत कांबळे, उरण तालुका भाजप अध्यक्ष रवी भोईर, उरण नगर परिषद माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप उरण शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, राजू ठाकूर, धनंजय कडवे, नंदू लांबे, नवीन राजपाल, माजी नगरसेविका रजनी कोळी, जान्व्ही पंडीत, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, माजी नगरसेविका आशा शेलार, स्नेहल कासारे, प्रियांका पाटील, झुंबर माने, उरण नगर परिषद लेखाधिकारी सुरेश पोसतांडेल, मनन पटेल, हितेश शाह, मनोहर साहतिया, सुरज ठवले, देवेंद्र घरत, उरण तालुका भाजप सरचिटणीस सुनील पाटील, उरण तालुका भाजप सरचिटणीस कैलास भोईर, मकरंद पोतदार, सुनील पेडणेकर, प्रकाश कांबळे, सागर मोहिते, विल्लेश कोळी, प्रेम माढवी, हस्तीमल मेहता, दिनेश ठक्कर, निलेश कदम, सचिन वैद्य, संतोष ओटावकर, जगदीश पाटील, अजित भिंडे, जासिम गॅस, चंद्रकांत गायकवाड, नरेश गावंड, संतोष ओतावकर, विशाल पाटेकर, मनोज ठाकूर, ओम थळी, कुणाल शिसोदिया, सुनील पेडणेकर शैलेश पोतदार आदी उपस्थित होते.

















**उलवे नोड : भारतीय जनता पक्ष व महिला मोर्चा उलवे नोड यांच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला होता. सेक्टर ९ मधील खारकोपर तलावाच्या बाजूला असलेल्या मैदानात या उत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यासोबतच भाजप पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, उलवे नोड अध्यक्ष विजय घरत, अमर म्हात्रे, निलेश खारकर, महिला मोर्चा अध्यक्ष योगिता भगत आदी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. मोठ्या जल्लोषात येथे मनोरे रचून दहीहंडी फोडण्यात आली व विजेत्यांना बक्षीस देण्यात आले.**

## संपादकीय

# दहीहंडीच्या जल्लोशात वाढ!

महायुती सरकारचा कायमच आपल्या सांस्कृतिक परंपरा, सण–सोहळे साजरे करण्याला संपूर्ण पाठिंबा राहिलेला आहे. यंदाचा दहीहंडी उत्सव अत्यंत उत्साहात पार पडण्याचे प्रमुख कारण हा पाठिंबा हेच असावे. सोबतच ठिकठिकाणची भरघोस बक्षिसे व गोविंदांना मिळालेला विम्याचा आधार यामुळेही दहीहंडी उत्सवातील गोविंदांचा सहभाग यंदा वाढलेला दिसला.

**मुंबई आणि ठाण्यातच नव्हे, तर नवी मुंबई आणि पनवेलपासून थेट पुण्यापर्यंत मंगळवारी दहीहंडीचा सण अत्यंत उत्साहात साजरा झाला. कोविड काळात दहीहंडी उत्सवात अल्पसा खंड पडला खरा, पण पाठोपाठ सत्तेवर आलेल्या एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने दहीहंडीच्या पारंपरिक सणावरील निर्बंध हटवून टाकत, उलट गोविंदांना विम्याचे संरक्षण देऊन या पारंपरिक खेळाला प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतली. त्यामुळे गेल्या दोन वर्षांपासून दहीहंडीच्या सणाची रंगत वाढतानाच दिसते आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर ठिकठिकाणी राजकीय नेत्यांनी तरुण गोविंदांना प्रोत्साहन देण्यासाठी अत्यंत आकर्षक अशा रोख बक्षिसांची घोषणा केल्यामुळे दहीहंडी उत्सवाचा उत्साह यंदा टिपेला गेलेला दिसला. महायुती सरकारने गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही, दहीहंडीच्या खेळादरम्यान दुखापत झाल्यास राज्यभरातील तब्बल ७५ हजार गोविंदांकरिता विम्याची हमी दिली. यामुळे गोविंदांना खेळातील सहभाग टिकवून ठेवण्यासाठी मोठे पाठबळ मिळाले. सकाळपासूनच मुंबई, ठाण्यात व इतरत्रही रस्त्यांवर गोविंदा पथकांचा वावर उठून दिसत होता. संध्याकाळपर्यंत हा उत्साह शिगेला पोहोचलेला दिसला. ठिकठिकाणी लाखोंच्या रकमांची बक्षिसे असल्याने उंचच उंच थर उभारण्यासाठी निरनिराळी गोविंदा पथके प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसली. महिला गोविंदांचाही यात उल्लेख करायलाच हवा. वाजतगाजत दहीहंडीच्या ठिकाणी येणाऱ्या या गोविंदांचा उत्साह वाढवण्यासाठी अनेक सेलेब्रिटींनीही उत्सवाच्या ठिकाणी आवर्जून हजेरी लावली. अनेक दहीहंडी मंडळांच्या सोहळ्यांना राजकीय नेत्यांचे पाठबळ असल्यामुळे ही नेते मंडळीही गोविंदांचा उत्साह वाढवण्यासाठी हजर होती. गोविंदांच्या साहसाचे कौतुक सारेच करत होते. अनेक ठिकाणी थरावर थर उभे राहताना उपस्थितांना डोळ्याचे पारणे फेडणारी दृश्ये व थरार पहायला मिळाला. अत्यंत नावाजलेल्या जयजवान मंडळाने ठाण्यात दहा थरांचा प्रयत्न केला, पण शेवटच्या थराचे वेळी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे हे थर कोसळले. यंदाच्या दहीहंडीचे उठून दिसणारे वैशिष्ट्य म्हणजे अनेक ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजनांमध्ये चांगलीच सुधारणा दिसून आली. अर्थात तरीही या साहसी खेळात काही ठिकाणी गोविंदा जखमी झाल्याचेही समजते. सुदैवाने यापैकी कुणालाही गंभीर स्वरुपाची इजा झालेली नाही. अनेक महिने शिस्तबद्ध पद्धतीने सराव करून गोविंदा या उत्सवात सहभागी होत असतात. त्याची कसोटी कृष्णजन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी असते. दहीहंडीच्या थरांची रचना हे एक प्रकारे ‘टीमवर्क’चे अप्रत्यक्ष प्रशिक्षणच असते. उंचावर टांगलेली हंडी फोडणारा एकच कुणी असला तरी खाली अनेक गोविंदा थरावर थर लावून त्यात सहभागी होत असतात. गोविंदा पथकांची ही सामुहिक कामगिरी पाहणे उपस्थितांनाही ‘टीमवर्क’चा धडा देत असते. यंदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोघांनीही ठिकठिकाणच्या दहीहंडी सोहळ्यांना भेटी देऊन गोविंदांचे कौतुक केले. अडीच वर्षांपूर्वी मुख्यमंत्री शिंदे आणि आम्ही पापाची हंडी फोडून राज्यात एक पुण्याची हंडी उभारली. आता आगामी विधानसभा निवडणुकांची दहीहंडीही महायुतीच फोडणार, असा आत्मविश्वास यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**

# संमोहन शास्त्र : समज, गैरसमज





**खबरबात**
नितीन देशमुख

कोपरी गावात एका इमारतीत एक धक्कादायक प्रकार घडला. दुपारच्या सुमारास एक फेरीवाला त्या इमारतीत भाडेकरूकडे तांदूळ विकण्याच्या बहाण्याने आला व त्या भाडोत्रीला तांदळाची गुणवत्ता तपासण्यासाठी तांदळाचा वास घेण्यास सांगितले. वास घेतल्यानंतर त्या भाडोत्रीने त्याच्याकडील रोख रक्कम, दागिने त्या फेरीवाल्याला स्वतःहून आणून दिले आणि हा प्रकार त्या इमारतीतच आणखी तीन ठिकाणी घडला. हा वशिकरण/भूल देणे असा काहीसा प्रकार असावा, अशी शंका त्यांनी व्यक्त केली आहे. अशाप्रकारे संमोहन करून अनेकांना फसवल्याच्या घटना आपण वाचत असतो, ऐकत असतो, पण संमोहन म्हणजे काय नक्की काय असते? हे आपल्याला माहित नसते. हिप्नोटीझम म्हणजेच मराठीत संमोहन. याबाबत अनेकांच्या मनात गोंधळ असतो, ते एक शास्त्र आहे. यावर लोकांचा विश्वास बसत नाही. त्यांना तो जादू टोण्याचा प्रकार वाटतो.

मुलुंड येथे राहणारे संमोहन तज्ज्ञ चंद्रशेखर देशमुख यांची भेट झाली असता, त्यांना विचारले, निवडणूक आली की, मोबाईलद्वारे प्रचार करण्यासाठी अनेक उमेदवार वेगवेगळ्या कंपन्याजवळ संपर्क करीत असतात. उमेदवार लाखो रुपये त्यावर खर्च करीत असतात. मग उमेदवार तुमच्याकडे येऊन मतदारांना संमोहित करण्याचे काम का देत नाहीत? प्रत्येक मतदान केंद्राबाहेर रांगेत उभ्या असलेल्या मतदारांना संमोहित करण्यासाठी माणसे उभी केली की झाले. मतदारांना पैसे वाटायला नको की, इतर कोणते आमिष दाखवायला नको. विरोधकांनाही मतदान यंत्रात घोळ केला असे म्हणायला नको, पण त्यांनी माझी निराशा केली. ते म्हणाले असे काही केले जात नाही.

चंद्रशेखर देशमुख यांनी आपल्या देशात तसेच परदेशात ही संमोहनाचे प्रयोग केले आहेत. त्यांनी पोलिसांना ताणतणावापासून सुटका मिळवण्यासाठी प्रशिक्षणही दिले आहे. ते म्हणतात संमोहन शास्त्र हे आपल्याला वरदान आहे. आपल्याकडे ऋषिमुनींनी १०–१२ वर्षे तपश्चर्या करून या शास्त्राचा वापर केला असल्याचे पुराणात आपल्याला वाचायला मिळते, पण आता अनेकांनी मोठेपणासाठी आपल्या मनात त्याबद्दल दहशत निर्माण केली आहे. यामुळे खरे तर अनेक मनोविकार असलेले रुग्ण ज्यांच्यावर डॉक्टर उपचार करू शकत नाहीत ते पूर्ण बरे करता येतात. मनाशी संबंधित ८० टक्के रोग, मनाचे तणाव किंवा मनोशारीरिक विकार उदाहरणार्थ मनातील भीती, चंचलता, एकाग्रता, न्यूनगंडता आणि लैंगिक रोगावर उपचार केल्यास अनेक रुग्ण पूर्ण बरे होतात, पण संमोहन करून कोणतीही शारीरिक व्याधी बरी होत नाही त्यासाठी डॉक्टरकडे जाऊनच उपचार करायला हवेत.

आपल्याकडे अनेक प्रकारच्या केसेस डॉक्टरांकडून येत असतात आणि त्या पूर्ण बर्या होऊन जातात असे सांगून त्यांनी काही अनुभव सांगितले. एका डॉक्टर मित्रांनी एका इंजिनियर मुलाची केस पाठवली हा मुलगा वय झाले तरी लग्न करण्यास नकार देत होता. घरचे काळजीत पडले होते. डॉक्टरांनी त्याची तपासणी केली. काही प्रॉब्लेम नव्हता. शेवटी त्यांनी चंद्रशेखर यांचेकडे त्याला पाठवले. त्याच्याजवळ चर्चा केल्यावर समजले की, लहानपणापासून तो फक्त मुलींच्यात खेळायचा. त्यामुळे त्याला आता लग्नाची भीती वाटत होती. त्याला १० दिवस उपचार दिल्यावर त्याला आत्मविश्वास आला. त्याचे आता लग्न झाले असून त्याचा सुखी संसार सुरू आहे.

दुसरी केस त्यांनी एका वकिलाची सांगितली. त्याला न्यायालयात उभे राहिल्यावर भीती वाटायची. तो उपचारासाठी आल्यावर त्याच्यावर संमोहन शास्त्राचा प्रयोग करून उपचार करण्यात आले. तो आज दिल्लीला सुप्रीम कोर्टात जाऊन यशस्वीपणे केस लढतो. तो आपल्या सहकाऱ्यांना सांगतो, मी आज जो काही आहे तो चंद्रशेखरसरांमुळेच. अनेक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासात एखाद्या विषयाची वाटणारी भीती घालवण्यासाठी किंवा अभ्यासात एकाग्रता होण्यासाठी संमोहन शास्त्र फार उपयोगी असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे याचा वापर आपण कसा करतो यावर प्रगति किवा अधोगती अवलंबून असते, पण संमोहन शक्तीही दिव्य शक्ती नाही. तिचा भूत–प्रेत याच्याशी काहीही संबंध नाही. संमोहन शास्त्र हे विज्ञान असल्याचे चंद्रशेखर सांगतात.

कळत–नकळत सकारात्मक प्रतिसाद दिल्याशिवाय कोणी संमोहित होऊच शकत नाही असे ते सांगतात. एकाग्रता, सहकार, संवेदनशक्ती, भाषा आणि मानसिक सुदृढता यामध्ये महत्त्वाची असते. त्यामुळे प्रयोगाचे वेळी सगळे संमोहित होत नसल्याचे दिसून येते. अनेक वेळा आपली दहशत निर्माण करण्यासाठी काही जण आपलीच माणसे शोमध्ये उभी करून सगळी संमोहित झाल्याचे आपल्याला दाखवतात पण ते खरे नसते. आपण नेहमी गुन्हेगारी प्रवृत्तीचे माणसे या शक्तीचा वापर करून लुबाडतात, असे ऐकतो ते काही अंशी खरे ही असते, पण त्याला कारण आपण त्यांना नकळत दिलेला सकारात्मक प्रतिसाद असतो.

आता हेच बघा, सर्वसाधारण पणे दुपारी महिला घरात एकटी असते. अशा वेळी एखादी महिला दरवाजा वाजवते. तिच्या डोक्यावर कसले तरी बोचके असते. दार उघडल्यावर तिला घरातील महिलेच्या अंगावरील कपडे आणि दागिने पाहून तिच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज आलेला असतो. दार वाजवण्यापूर्वी तिने दारावरील नाव वाचलेले असते. त्यामुळे ती पाणी मागते आणि संभाषणाला सुरुवात करते. बाई तुमी सावंत, कुठल्या गावाच्या, अरे मी पण बाजूच्या वाडीतील संभाषण सुरू होते तिला आपली गाववाली समजून आत घेतले जाते. ती आपले घर गावातल्या देवळाच्या किवा शाळेच्या बाजूला असल्याचे सांगते कारण प्रत्येक गावात देऊळ आणि शाळा असतेच. मग ती घरातल्या बाईला प्रश्न विचारत जाते तिला प्रतिसाद मिळाल्याने घरातील बाई संमोहित होऊन तिला बेडरूमपर्यंत नेते ती कपाट साफ करून जाते जर तिला प्रतिसाद दिला नसता, तर ती संमोहित झाली नसती.

एखादा अनोळखी माणूस रस्त्यात भेटल्यावर आपल्याला अरे, सुनील किती दिवसांनी भेटलास म्हणून हाक मारतो. आपण मी सुनील नाही प्रकाश म्हणून सांगतो. तो म्हणतो अरे मी विसरलोच होतो. तू प्रकाश ना मग तुझा भाऊ सुधीर काय करतो? भेटला नाही बरेच दिवसात. आपण लगेच म्हणतो. त्याचे नाव सुधीर नाही सुरेश. अरे हा, खूप वर्षे झाली ना विसरलोच होतो त्याचे नाव. कसा आहे सुरेश? असे प्रश्न विचारून आपल्याकडून माहिती काढत जातो. आपण त्याला सकारात्मक प्रतिसाद दिल्याने संमोहित होऊ शकतो. आपण जर त्याला सकारात्मक प्रतिसादच दिला नाही तर आपल्याला संमोहित करता येत नाही, अशा वेळी तो आपला नाद सोडून दुसऱ्या व्यक्तीच्या शोधत निघून जातो.

त्यामुळे प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, संमोहन हे एक शास्त्र आहे. हे शास्त्र कोणीही कोणत्याही वयात शिकून स्वत:चे जीवन उज्ज्वल आणि आदर्श करू शकतात, पण यासाठी नियम आणि नियमनाची आवश्यकता आहे. जर आपले मन सशक्त असेल तर आपले जीवन ही सुंदर होऊ शकते.

## बदलते तंत्रज्ञान

### सोशल मीडियावर ॲक्टिव्ह राहणं ठरतंय घातक!

आजकाल देशातील लोक सोशल मीडियावर बराच वेळ घालवू लागले आहेत. त्यामुळे लोकांच्या शरीरात डोपामाइनची लेव्हल वाढत आहे. आता तुमच्या मनात प्रश्न निर्माण होत असेल की हे डोपामाइन म्हणजे काय? रिपोर्ट्सनुसार डोपामाइन हे एक प्रकारचे केमिकल आहे जे आपल्या मेंदूमध्ये तयार होते. हे मोटिवेशन आणि आनंदात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, मात्र डोपामाइनचे जास्त प्रमाण हे हानिकारक आहे.



डोपामाइन एक न्यूरोट्रान्समीटर आहे जो मेंदूमध्ये जातो व अशा गोष्टी करण्यास प्रेरित करतो ज्यामुळे आपल्याला त्वरित आनंद मिळतो. आता सोशल मीडिया वापरणे किंवा व्हिडीओ गेम्स खेळल्याने व्यक्तीच्या मेंदूत डोपामाइन रिलीज होते आणि आता त्या व्यक्तीला त्याच गोष्टी पुन्हा पुन्हा करण्यास प्रवृत्त करते. म्हणूनच जास्त डोपामाइन रिलीज होणेदेखील धोकादायक ठरू शकते.

डोपामाइनचा अतिरेक शरीरासाठी हानिकारक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डोपामाइन जास्त प्रमाणात रिलीज झाल्यामुळे व्यक्तीमध्ये संयमाची कमतरता भासू लागते. याशिवाय ते मानसिकदृष्ट्याही कमजोर होऊ लागतात. कोणत्याही गोष्टीच्या व्यसनामुळे माणूस आपला स्वभाव गमावू शकतो. जास्त प्रमाणात डोपामाइन रिलीज झाल्याने चिडचिड होऊ लागते.

पूर्वी सामान्य गोष्टी लोकांना आनंद देत असते, त्यामुळे डोपामाइन पुन्हा तेच काम करण्यास प्रवृत्त करत असे, पण आता लोक सोशल मीडियावर जास्त वेळ घालवतात. सोशल मीडियावर एक्टिव्ह राहिल्यानंतर लोकांच्या मेंदूमध्ये डोपामाइन रिलीज होते. मिशिगन युनिव्हर्सिटीच्या मते, जगभरातील सुमारे दोन कोटी लोकांना सोशल मीडियाचं व्यसन आहे. हे टाळण्यासाठी अनेक तरुण डोपामाइन डिटॉक्सचाही अवलंब करीत आहेत.

लोकांना अशा एक्टिव्हिटीकडे लक्ष द्यावे लागेल ज्यामुळे डोपामाइन लवकर रिलीज होते. सोशल मीडिया, तासनतास गेम खेळणे, जंक फूडचे सेवन करणे अशा गोष्टींमुळे डोपामाइन लगेच रिलीज होते. त्यामुळेच डिटॉक्ससाठी या सर्व गोष्टींपासून दूर राहणं गरजेचे आहे. जर तुम्ही पहिल्यांदाच डोपामाइन डिटॉक्स करत असाल, तर दिवसाच्या सुरुवातीला व झोपण्यापूर्वी दोन ते तीन तास आधी डोपामाइन लवकर रिलीज करणाऱ्या गोष्टींपासून दूर राहा. डोपामाइन डिटॉक्ससाठी, आपण कमी डोपामाइन सोडणाऱ्या एक्टिव्हिटीवर फोकस केले पाहिजे. पुस्तक वाचणे, ध्यानधारणा, बागकाम यासारख्या गोष्टींकडे अधिक लक्ष दिले पाहिजे.

# ज्येष्ठ संगीतकार राम कदम



**निमित्त**

मराठी चित्रपट संगीत लोकप्रिय करण्यात ज्या मोजक्या संगीतकारांचे कर्तृत्व कारणीभूत ठरले त्यात राम कदम यांचे स्थान वरचे आहे. त्यांनी संगीत दिलेल्या गीतांची मोहिनी रसिकांना आजही भुरळ घालते.

राम कदम यांचा जन्म २८ ऑगस्ट १९१८ रोजी झाला. काही काळ ते संत गाडगेबाबांच्या सहवासातही राहिले. १९४०च्या सुमारास ‘प्रभात’मध्ये त्यांचे आगमन झाले ते ऑफिसबॉय म्हणून. ऑफिसबॉय ते संगीतकार असा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. ‘प्रभात’मध्ये सुरुवातीला ते क्लॅरोनेट वादक म्हणूनही काम करत होते. शांतारामबापूंची खोली झाडताना राम कदम यांना कमीपणा कधीच वाटला नाही. उलट एवढ्या प्रतिभासंपन्न व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळतेय याचा आनंद झाला. हळूहळू प्रभातच्या संगीत विभागात त्यांचा प्रवेश झाला आणि मान्यवर संगीतकाराचा त्यांना सहवास लाभला.

‘पिंजरा’, ‘सोंगाड्या’, ‘एकटा जीव सदाशिव’, ‘झुंज’, ‘चंदनाची चोळी अंग अंग जाळी’, ‘पाहुणी’, ‘सुशिला’, ‘पारध’, ‘गड जेजुरी जेजुरी’ अशा कित्येक संगीतमय चित्रपटांची देणगी मराठीला मिळाली ती केवळ राम कदम यांच्यामुळे. त्यांच्या संगीतामुळे अनेक चित्रपट तरले, विक्रमी ठरले. असे म्हटले जाते की, गझल करावी तर मदन मोहननी, कव्वाली करावी तर रोशननी, भावगती करावे तर वसंत प्रभूंनी आणि लावणी करावी तर राम कदम यांनीच! मराठी लावणीचे लावण्या खुलवून त्यांनी तिला एका उंचीवर नेऊन ठेवलं.

मायबाप रसिकांनी दिलेली ’लावणी सम्राट’ ही बिरुदावली अभिमानाने मिरवली. कलाकाराला आयुष्यात किमान एक संधी अशी मिळते की जिचे तो सोने करून जातो. ‘पिंजरा‘ ही संगीतकार राम कदम यांना मिळाली व त्या संधीचे राम कदम यांनी सोने केले. बाजीराव मस्तीनी या चित्रपटातील पिंगा गाण्याबाबत पानीपतकार विश्वास पाटील यांनी या गाण्याबाबत एक नवा मुद्दा समोर आणला होता. तो म्हणजे, मुळात ’पिंगा ग पोरी पिंगा...’ याची चाल प्रसिद्ध मराठी संगीतकार राम कदम यांनी बांधली आहे. पिंगा.. ही चाल मूळ मराठी संगीतकार राम कदम यांनी बांधलेली असून त्यांनी संगीतबद्ध केलल्या तीन चित्रपटांतील गाण्यांत त्यांनी ही चाल वापरली असल्याचे विश्वास पाटील म्हणतात. पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार १९६२ सालचा अनंत माने दिग्दर्शित भाग्यलक्ष्मी, १९७५ सालचा व्ही शांताराम प्रोडक्शनचा चंदनाची चोळी अंग अंग जाळी आणि १९७६साली अनंत माने दिग्दर्शित पाहुणी या चित्रपटांतील गाण्यांत राम कदमांनी ही चाल वापरली होती. मधु पोतदार यांनी ‘संगीतबद्ध राम कदम’ या नावाने राम कदम यांचे पुस्तक लिहिले आहे. या संगीतकाराच्या संपूर्ण कारकीर्दीचा तपशीलवार आढावा त्यात घेतला आहे. राम कदम यांचे १९ फेब्रुवारी १९९७ रोजी निधन झाले.

कलेचे क्षेत्र कोणतेही असो, कलाकाराला आयुष्यात किमान एक संधी अशी मिळते की जिचे तो सोने करुन जातो. ‘पिंजरा‘ ही गीतकार जगदीश खेबुडकर आणि संगीतकार राम कदम यांना मिळालेली अशीच एक संधी. खेबुडकरांच्या सगळ्याच गीतांचे शब्द विलक्षण आशयपूर्ण आहेत, आणि रामभाऊंच्या चाली तर अस्सल मराठमोळ्या ठसक्याच्या आहेत. ‘पिंजरा’ चित्रपटाने खेबूडकर आणि राम कदमांना यशकीर्तीच्या शिखरावर विराजमान केले.

**क्लिक...क्लिक...!**




**अलिबाग : येथील ब्लूमिंग बड्स प्री प्रायमरी स्कूलमध्ये चिमुकल्यांनी गोपाळकाला साजरा केला.** (छाया : नितीन शेडगे)

## आरोग्य प्रहर

### पीसीओएस रुग्णाने वजन कमी करण्यासाठी ‘हे’ करा!

अनेक महिला आणि मुलींना पीसीओएसचा त्रास असतो. या समस्येत शरीरातील हार्मोन्सचे संतुलन बिघडते. शरीरात स्ट्रोजनऐवजी टेस्टोस्टेरोन हे पुरुषी हार्मोन्स वाढते. पीसीओएसमध्ये चेहऱ्यावरचे व अंगावरचे केस वाढणे, पाळी अनियमित येणे, चेहऱ्यावर मुरमे वा पुटकुळ्या येणे, ओटीपोट वाढणे तसेच गर्भधारणेत अडचणी जाणवणे या समस्या जाणवतात. यामध्ये वजन कमी करणेदेखील कठीण होते. या संदर्भात होलिस्टिका वर्ल्डचे संचालक, समग्र आरोग्य प्रशिक्षक डॉ. धर्मेश शाह यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



प्रथम आहाराचे व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी योग्य खाद्यपदार्थांचा समावेश करा आणि उच्च प्रथिनांचे सेवन करा. चरबी आणि साखर टाळण्यासाठी प्रक्रिया केलेले अन्न खाणे बंद करा.

शाह यांच्या मते, वजन कमी करण्यासाठी हाय इंटेन्सिटी व्यायामाची मदत होते. तणाव व्यवस्थापन हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. दीर्घकालीन तणावामुळे पीसीओएसमध्ये हार्मोनल असंतुलन बिघडू शकतो, ज्यामुळे वजन कमी करणे कठीण होते. ध्यान, योग आणि दीर्घ श्वासोच्छ्वास यांसारखे व्यायाम केल्यास तणावाचे व्यवस्थापन करण्यास मदत करू शकतात.

पुरेशा झोपेला प्राधान्य देणे आणि नियमित झोपेचे वेळापत्रक राखणे यामुळेदेखील वजन व्यवस्थापनावर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. झोपेच्या आधी मोबाइल, टीव्हीची स्क्रीन पाहू नका, तसेच योग्य पूरक आहार घ्या.

एका महिन्यात कमी करण्यासाठी आदर्श वजन सामान्यत: २.५ ते ३ किलोग्रॅमदरम्यान असते, ज्यामुळे तुमचे शरीर आरोग्यावर कोणतेही प्रतिकूल परिणाम न होता हळूहळू वजन कमी करू शकते.

तुमची वजन कमी करण्याची योजना सुरक्षित आणि प्रभावी आहे याची खात्री करण्यासाठी नेहमी तुमच्या डॉक्टरांचा आणि पोषणतज्ज्ञांचा सल्ला घ्या. अति आहार किंवा बाहेरच्या खाद्यपदार्थांपासून दूर राहा. तुमच्या शरीराच्या गरजांकडे लक्ष द्या. तुम्हाला थकवा, अशक्त किंवा अस्वस्थ वाटत असल्यास डॉक्टरांचा आणि पोषणतज्ज्ञांचा सल्ला घ्या. वजन कमी करण्यासाठी हाय इंटेन्सिटी व्यायामाची मदत होते. तणाव व्यवस्थापन हा आणखी एक महत्त्वाचा घटक आहे. सहाय्यक मित्र आणि कुटुंबामध्ये राहा, जे तुम्हाला प्रोत्साहित आणि प्रेरित करू शकतात.

# रायगडात दहीहंडी उत्सव जल्लोषात

**पाली : प्रतिनिधी**

पालीसह सुधागड तालुक्यात मंगळवारी गोविंदाची दहीहंडीची धूम पाहायला मिळाली. अनेक ठिकाणी पारंपरिक पद्धतीने गोपाळकाला साजरा करण्यात आला. गोकुळाष्टमी हा पारंपरिक महत्त्वाचा व उत्साहाचा सण आहे. सर्व अबाल वृद्धांसह तरुणाईला गोकुळाष्टमीची ओढ लागलेली असते. सुधागड तालुक्यात पाली, जांभूळपाडा, परळी, पेडली आदी सर्वच ठिकाणी दहीहंडीची धूम पाहायला मिळाली. पारंपरिक पद्धतीने तसेच पारंपारिक पेहराव व पारंपरिक वाद्यांच्या चालीवर गोपाळकाला उत्सव साजरा करण्यात आला.

आदिवासी वाड्या पाड्यावरदेखील गोपाळकाल्याचा उत्साह पाहायला मिळाला. छोट्या मोठ्या दहीहंडी फोडण्याचा थरारदेखील अविस्मरणीय होता. नृत्याचा ठेका धरत, गाणी म्हणत हे गोपाळ घरोघरी जात होते. तेथे दहिकाला, फळे आदी प्रसाद व अंगावर पाणी ओतून त्यांचे स्वागत झाले.

जन्माष्टमीच्या शुभ मुहूर्तावर सुधागड तालुक्यातील रा. जि. प नेणवली शाळेत निपुण शिक्षण हंडी फोडण्यात आली. हंडी फोडल्यानंतर त्यातून निघालेले निपुण भाषा, गणित व शिक्षण साहित्य विद्यार्थ्यांनी आनंदाने वेचले. या कार्यक्रमातून मौजमजेबरोबर विद्यार्थ्यांना निपुण भारत अभियानाचे महत्त्वही समजावून सांगण्यात आले. या निपुण हंडीत पाणी बचतीचा संदेशदेखील मिळाला.

या कार्यक्रमाने विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या सर्वांचे मन प्रफुल्लित केले. विद्यार्थ्यांनी उत्साहात मनोरे रचून निपुण हंडी फोडली. या वेळी मुलींनीही मुलांसोबत मिळून धाडस दाखवत मनोरे रचले. मुलांच्या हाती विविध शैक्षणिक साहित्य मिळाले त्यात अक्षर, अंक, शब्द, रंग, चित्र मुलांनी वाचून ओळखुन दाखवले. तिसरी पर्यंतच्या मुलांना ही संधी मिळाली. या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये साक्षरता, संख्याज्ञान व निपुणतेची जाणीव निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी निपुणतेच्या ध्यास घेण्याची शपथ घेतली. या वेळी या अनोख्या कार्यक्रमाबद्दल पालकांनी आनंद व्यक्त केला. त्यांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

> **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा निपुण भारत अभियानाचा भाग म्हणून हा उपक्रम घेण्यात आला. हे मनोरे रचून निपुण हंडी आयोजन गुणवत्ता विकासास पूरक ठरेल.**
>
> **-राजेंद्र अंबिके, मुख्याध्यापक, नेणवली**



**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यात १६८ सार्वजनिक तर २९१ खासगी अशा ४५९ दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या. गावागावात बांधलेल्या गोविंदा पथकांनी फोडल्या. यंदा कर्जत व नेरळ शहरात असलेल्या विविध राजकीय पक्षांच्या दहीहंड्या बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे गावोगावचे गोविंदा उत्साहात होते.

यंदा दहीहंडीच्या दिवशी सकाळी थोडासा पाऊस सुरू झाल्याने गोविंदा थोडे नाराज होते, मात्र हंडी फोडताना इमारतींवरून पाण्याच्या बदलाच्या बदल्या नागरिक ओतत असल्याने गोविंदा खुश होते. शाळांना सुटी असल्याने चिमुरड्या गोविंदानी सकाळपासूनच गोविंदा खेळायला सुरुवात केली. कमी उंचीवरील दाहीहंड्या त्यांनी फोडून मनसोक्त धमाल केली. सकाळपासूनच गावोगावच्या दहीहंड्या गोविंदानी फोडण्यास सुरुवात केले होती.

नेरळ शहरात आमदार महेंद्र थोरवे यांनी खुल्या गटासाठी एक लाख २५ हजाराचे तर कर्जत तालुका गटासाठी एक लाख ११ हजाराचे बक्षिसे असणार आहे. तसेच सहा थरांची सलामी देणाऱ्या गोविंदा पथकाला दहा हजाराचे रोख पारितोषिक दिले जाणार आहे. एक लाख ११ हजार १११ रुपयांची, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे यांनी एक लाख ३१ हजार ३१ रुपयांची, माजी नगरसेवक संतोष पाटील यांनी एक लाख सहा हजार ५६५ रुपयांची दहीहंडी बांधल्या असून त्या रात्री उशिरापर्यंत फोडल्या नव्हत्या. या तिन्ही ठिकाणचे आकर्षण म्हणजे नामवंत कलावंतांनी उपस्थिती दर्शविली आहे.

रात्री काही गावांमध्ये मंदिरांमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे आयोजन केले होते. तर अनेकांच्या घरीसुद्धा श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात येत होता. रात्री बाराच्या सुमारास जन्मोत्सवास सुरुवात झाली. त्यानतर श्रीकृष्णाचे पाळणे, आरत्या सुरू झाल्या. या वेळी गावोगावी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.





खोपोली : तालुक्यात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. यामध्ये कानिफनाथ भक्तांनी दहीहंडी उत्सव पारंपारिक पद्धतीने वाद्यांच्या तालात साजरा करण्यात आला. बाजारपेठेतील मानाच्या दहीहंड्या या भक्तांनी वाजत गाजत फोडल्या. (छाया : जयवंत माडपे)


राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

## अर्जंट पाहिजेत

पनवेल मधील बिल्डर फर्मसाठी अकाउंटेट पाहिजे, बी.कॉम. टॅली, ३-४ वर्षाचा अनुभव व ऑफिस बॉय पाहिजे.

संपर्क-८३५५८१७७१८/९८१९६९५७७४


## टायटल व्हेरीफिकेशन करीता जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. अनुज महेंद्र बांठिया, श्री. तनुज महेंद्र बांठिया आणि श्री. आकाश महेंद्र बांठिया रा मोती महल, एम. जी. रोड, ता. पनवेल, जि. रायगड यांनी सांगितल्यानुसार, मौजे गिरवले, तालूका पनवेल, जिल्हा रायगड येथील खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकतीचे टायटल व्हेरीफिकेशन / स्वामीत्व तपासणी करणे करीता सदरची नोटीस प्रसिद्ध केली असून, सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहेत.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे**
**मौजे - गिरवले, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| श्री.विरेंद्रकुमार रतनचंद बांठिया, श्री. प्रकाश हरकचंद बांठिया, श्री. सुरेश हरकचंद बांठिया, श्रीमती. दिपाली हेमंत बाफना, श्री. राजेंद्र कांतीलाल बांठिया, श्री. नरेंद्र कांतीलाल बांठिया, श्री. सुभाष मोतीलाल बांठिया, श्री. सुनील शशिकांत बांठिया, श्री. मनोज शशिकांत बांठिया, श्रीम.निता अनुजकुमार भंडारी, श्री. अनुज महेंद्र बांठिया, श्री. तनुज महेंद्र बांठिया, श्री. आकाश महेंद्र बांठिया, | ७४ | १-०३-०० पोटखराबा ०-०८-०० --------------- १-११-०० | ६.६९ |

सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अॅटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिदध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पूराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. या प्रमाणे मुदतीत वैध्य हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून सदर मिळकतीचे त्यासंबधी कोणाचेही कायदेशिर हक्क, हितसंबध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे गृहीत धरून आमचे आशिलांस सदर मिळकतींचे टायटल व्हेरीफिकेशन सर्टीफिकेट / स्वामीत्वाचा तपासणीचा दाखला देण्यात येईल व वरील मूदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक -: २७.०८.२०२४
पनवेल

सही/-
अॅड.प्रगती दिनेश ठाकुर,
नगरपालीका शॉपींग कॉम्प्लेक्स, ऑफीस क्र. २२,
वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ,
पनवेल, रायगड
मो. नं. ९१७२५६१११११

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, आमचे अशिल हे सिडको लि. यांच्या १२.५ टक्के योजनेप्रमाणे वितरीत करण्यात आलेला खालील वर्णनाचा भूखंड सध्याचे लिजधारक **मे. नेहा एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रा. सौ. बेबी जगन्नाथ हिरे** यांच्याकडून मोबदल्यापोटी त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इरादयात आहेत. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे - उलवे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| सिडको फाईल नं. | भूखंड नं. | सेक्टर नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १०२१ | ए-६० | १३ | ६४९.६३ चौ.मी. |

तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. २७/०८/२०२४.**

**सही/-**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट,
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ,
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१

## जाहीर नोटीस

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**अर्ज क्रमांक : MACP ६९७/२०२४**

**जयश्री विलास भुवड आणि अन्य ३** — **अर्जदार**
**विरूद्ध**
**सुरेश कुमार वीज** — **विरूद्ध पक्षकार**
**आणि**
**अॅको जनरल इं. कंपनी लिमिटेड** — **विमाकार**

**प्रति,**
**सुरेश कुमार वीज**
**पत्ता-** ट्रान्झिट गोडाऊन ४६,तळमजला,
कृष्णा पेट्रोल पंप मागे,
कळंबोली, जि.रायगड
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **१९-१०-२०२४** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **सदस्य श्री. संजय किशनराव चौदंते** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक **२५-०६-२०२४** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
सदस्य
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत ही सदर मिळकतीचे मालक व कबजेदार मकसूद फखरुद्दीन नजीर वगैरे १३ यांची असून त्यांची नावे पनवेल येथील उप अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडील मालकत्ता पत्रकाचे उताऱ्यावर दाखल आहेत. सदर मिळकतीचे वर्णन येणेंप्रमाणेः

**'स्थावर जमीन मिळकत'**
गाव पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड

| अ.क्र. | नगर भूमापन क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| १. | १२५८/ए१ | ८६.३० | क |
| २. | १२५८/१ए२ | २६.०० | क |
| | | **पैकी १३.०० असा** अविभक्त निम्मा हक्क - हिस्सा | |
| ३. | १२५८/ए३ | ३२.२० | क |
| | | **पैकी १६.१० असा** अविभक्त निम्मा हक्क - हिस्सा | |

**असे एकूण विक्री योग्य क्षेत्र ११५.४० चौ.मी.**

**'दुकान व घर मिळकत'**
पनवेल महानगरपालिका हद्दीतील

| नगर भूमापन क्रमांक | मालमत्ता क्र. जुना मालमत्ता क्र. | दुकान व घर मिळकतीचा तपशिल |
|---|---|---|
| १२५८ | V2Z१००३८५६२/१ (जुना मा.क्र. १२५८) | सुमारे ५० वर्षापूर्वीचे दगड-विटांचे कच्चे बांधकाम असलेला दुकान गाळा, क्षेत्र लांबी ३५ फुट X रुंदी १० फुट म्हणजेच एकूण क्षेत्र ३५० चौ. फुट बिल्टअप; आणि त्यामागील एक खोली, क्षेत्र ३५० चौ. फुट बिल्ट-अप लांबी ३५ फुट X रुंदी १० फुट म्हणजेच एकूण क्षेत्र ३५० चौ. फुट बिल्टअप; आणि पहिल्या मजल्यावरील घर मिळकत, क्षेत्र ६५० चौ. फुटबिल्ट-अप लांबी ६५ फुट X रुंदी १० फुट म्हणजेच एकूण क्षेत्र ६५० चौ. फुट बिल्टअप |

सदर स्थावर जमीन मिळकत आणि त्यावरील दुकान गाळा व एक खोली आणि पहिल्या मजल्यावरील घर मिळकत ह्या मिळकतीस 'सदर मिळकत' असे संबोधिले असून त्यास एकत्रित चतुः सीमा येणेंप्रमाणे आहेत.

पूर्वेस : नगर भूमापन क्र. १२५८/अे१ ची मिळकत.
पश्चिमेस : नगर भूमापन क्र. १२५९ ची मिळकत.
दक्षिणेस : नगर भूमापन क्र. १२५८/१अे आणि १२५८/१अे ची मिळकत.
उत्तरेस : एम.जी. रोड.

मकसूद फखरुद्दीन नजीर वगैरे १३ यांनी सदर स्थावर मिळकतीतील त्यांचा अविभक्त मालकी हक्क हिस्सा व त्यावरील तळ मजल्यावरील दुकान गाळा आणि त्यामागील एक खोली आणि पहिल्या मजल्यावरील घर मिळकत अशी मिळकत विकत देणेबाबत आमचे अशिलांशी 'साठेकरार' केलेला आहे.

सदर मकसूद फखरुद्दीन नजीर वगैरे १३ हे आमचे अशिलाबरोबर उक्ती किंमत घेवून सदर वर नमुद केलेली मिळकत रजिस्टर्ड 'कायम खरेदीखता 'ने विकत घेण्याचा व्यवहार करीत आहेत. आणि मकसूद फखरुद्दीन नजीर वगैरे १३ यांनी सदरबाबत हरकती मागविणेकरीता वर्तमानपत्रात 'जाहीर नोटिस' प्रसिध्द करण्याचे अधिकार आमचे अशिलांना दिलेले आहेत.

तरी सर्व संबंधितांना या 'जाहीर नोटीसी'ने सुचित करण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या 'सदर मिळकती 'बाबत कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क - हितसंबंध व अधिकार असल्यास आणि अगर कोणाही व्यक्ती, इसम, संस्थेने मकसूद फखरुद्दीन नजीर वगैरे १३ यांचेशी खरेदीखत, साठेकरार, विकसन करार, एम.ओ.यू., भाडेपट्टा, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, गहाण, दान, बक्षीसपत्र, अखत्यारपत्र, इच्छापत्र वगैरे अगर अन्य प्रकारे कोणताही कायदेशीर मालकी हक्क हितसंबंध, ताबेकबजा, वहीवाट वापर वगैरे अधिकार व हक्क निर्माण केला असल्यास अशा व्यक्ती, इसम, संस्थेने सदर 'जाहीर नोटीस' प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या मुदतीत आपला कायदेशीर हक्क व अधिकार कागदोपत्री पुराव्यानिशी रजिस्टर्ड पोस्ट ए.डी.ने आमचेकडे सिध्द करावा.

अन्यथा अशी हरकत वर नमुद केलेल्या मुदतीत आम्हास न मिळाल्यास सदर जमीन मिळकतीच्या खरेदी-विक्री व्यवहारास कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत नसल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी- विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी म्हणून ही नोटीस प्रसिध्द केली आहे.

**पनवेल.**
**दि. २७/०८/२०२४.**

**सही/-**
**अॅड. सलिल अब्दुलरहेमान शेख**
**एम.ए.एलएल.बी.- अॅडव्होकेट हायकोर्ट**
**कार्यालय :** १ स्वप्नपूर्ती, १३४६ बी/१,
शाह प्लाझा जवळ, प्रभु आळी, पनवेल,
जिल्हा रायगड.- ४१०२०६

## महाराष्ट्र शासन

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

**दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१** — **फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८**
ई-मेल :- collector.raigad@maharashtra.gov.in — **ई-मेल :-** dydeoraigad@gmail.com

**क्र/निवडणूक /कार्या ६(२)/लेखनसामुग्री निविदा/ २०२४** — **दि. २६/०८/२०२४**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**ई निविदा सुचना क्रमांक ०१/२०२४**
**लेखनसामुग्री व इतर अनुषंगिक बाबी पुरवठा बाबत ई निविदा सुचना**

आगामी **विधानसभा** सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान **रायगड जिल्हयातील सात विधानसभा मतदार संघामध्ये मतदार संघनिहाय** जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी **लेखनसामुग्री व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा** करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई - निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :-** रायगड जिल्ह्यातील लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये रायगड जिल्हयातील सात विधानसभा मतदार संघामध्ये मतदार संघनिहाय **लेखनसामुग्री व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा** करणेबाबत.

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. ३० लक्ष |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ५,४००/- (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू. ९०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. ९०,०००/- |
| ई- निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. २८/०८/२०२४ सकाळी १०.०० वाजता |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | दि. २८/०८/२०२४ सकाळी १०.०० पासून ते दि. १३/०९/२०२४ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. १०/०९/२०२४ सकाळी ११.०० वाजता |
| ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १३/०९/२०२४ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई-निविदा फार्म क्रमांक-१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. १८/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDFमध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
६ निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.
७ लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा) मधील अट क्र.१ ते ११ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांपैकी एक जरी दस्तऐवज उपलब्ध नसल्यास निविदा अग्राह्य समजण्यात येऊन निविदेचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येणार नाही.

**सही/-**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

## महाराष्ट्र शासन

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

**दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१** — **फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८**
ई-मेल :- collector.raigad@maharashtra.gov.in — **ई-मेल :-** dydeoraigad@gmail.com

**क्र/निवडणूक /कार्या ६(२)/ भोजन व्यवस्था व इतर अनुषंगिक साहित्य निविदा/ २०२४** — **दि. २६/०८/२०२४**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**ई निविदा सुचना क्रमांक ०१/२०२४**
**चहापान, अल्पोपहार, भोजन व्यवस्था, पाणी जार व इतर अनुषंगिक बाबी पुरवठा बाबत ई निविदा सुचना**

**आगामी विधानसभा सार्वत्रिक** निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान रायगड जिल्हयातील सात विधानसभा मतदार संघामध्ये मतदार संघनिहाय जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी **चहापान, अल्पोपहार, भोजन व्यवस्था, पाणी जार व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा** करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :- रायगड जिल्ह्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान रायगड जिल्हयातील सात विधानसभा मतदार संघामध्ये मतदार संघनिहाय चहापान, अल्पोपहार, भोजन व्यवस्था, पाणी जार व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेबाबत.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. ४० लक्ष |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ५,४००/- (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू. ९०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. १,२०,०००/- |
| ई- निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. २८/०८/२०२४ सकाळी १०.०० वाजता |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | दि. २८/०८/२०२४ सकाळी १०.०० पासून ते दि. १३/०९/२०२४ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. १०/०९/२०२४ सकाळी ११.०० वाजता |
| ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १३/०९/२०२४ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई-निविदा फार्म क्रमांक-१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. १८/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDFमध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
६ निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.
७ लिफाफा क्र. १ (तांत्रिक लिफाफा) मधील अट क्र.१ ते १२ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांपैकी एक जरी दस्तऐवज उपलब्ध नसल्यास निविदा अग्राह्य समजण्यात येऊन निविदेचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येणार नाही.

**सही/-**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

## निवडक

### किशन खारके यांना सिल्वर मेडल



**पनवेल :** १८ ते २६ ऑगस्ट २०२४ दरम्यान गोवा येथे झालेल्या ऑल इंडिया ओपन शूटिंग कॉम्पिटिशन चॅम्पियशिप २०२४ मध्ये ५० मिटर फ्री पिस्टल नेमबाजी स्पर्धेमध्ये किशन खारके, (नेरे पनवेल) यांना सिल्वर मेडल मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सिद्धांत रायफल व पिस्टल शूटिंग असोसिएशनचे कार्यकारी सदस्य प्रीतम पाटील, महेश फुलोरे, अलंकार कोळी सुनील मढवी, शेखर मुंबईकर, राजू मुंबईकर, समाधान घोपरकर व अविनाश भगत यांच्या तर्फे तसेच ते स्वतः प्रशिक्षक असलेल्या इंडियन मॉडेल स्कूल अँड जुनिअर कॉलेजमध्ये असलेल्या शूटिंग रेंज उलवे तर्फे कौतुक केले जात आहे. या वेळी त्यांना पुढील होणाऱ्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### पनवेलमध्ये शिक्षक प्रशिक्षण

**पनवेल :** अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन व डाऊ केमिकल इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत शिक्षक प्रशिक्षण घेण्यात आले. या शिक्षण प्रशिक्षणासाठी १५ शाळेतील गणित व विज्ञान या विषयांचे शिक्षकांनी प्रशिक्षणात सहभाग घेतला होता. या वेळी एकूण ४० शिक्षक उपस्थित होते. त्यांच्यासोबत सायन्स, गणित, अगस्त्या वर्चुअल स्कूल लॉगिन तसेच शिक्षकांसोबत वेगवेगळे खेळ घेऊन वेगवेगळे उपक्रम राबवण्यात आले. या सर्व उपक्रमात सर्व शिक्षकानी सहभाग घेतला होता. या प्रशिक्षणासाठी सर्व शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. या सर्वांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले आणि शिक्षण प्रशिक्षणाचे कौतुक केले.



### पनवेल शनिवारी सुवर्णप्राशन शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील कोसवेदिक्स क्लिनिकच्या वतीने सुवर्णप्राशन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या शनिवारी (दि. ३१) सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे शिबिर पनवेल डेपो समोरील केतकी हॉटेलच्या बाजूला होईल. या शिबिरात १ ते १२ वर्षांपर्यंतच्या बालकांना मोफत डोस देण्यात येणार आहे.

# जोरदार पाऊस भातशेतीला ठरतोय पूरक

## उरणमध्ये शेतकऱ्यांना दिलासा | पिकांवरील रोगाचा प्रतिबंध होण्यास मदत

**उरण : रामप्रहर वृत्त**

शनिवारी व रविवारी दोन दिवस उरणच्या शेती क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. ऑगस्ट महिन्यात सलग पंधरा दिवसांचा पावसाचा खंड पडला होता. त्यामुळे उरणमधील शेकडो हेक्टर जमिनीवरील भातपिके संकटात आली होती, मात्र हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार दोन दिवस जोरदार पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे भात शेतीत पाणी वाढल्याने भात पिकांना संजीवनी मिळालेली आहे.



अनेक दिवसांपासून पडणाऱ्या कडक उन्हामुळे नागरिक हे उकाड्याने त्रस्त झाले होते. या पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. त्यामुळे उरणच्या नागरिकांनाही दिलासा मिळाला आहे.जुलै महिन्यात झालेल्या जोरदार पावसामुळे उरण तालुक्यातील गावे आणि शहराला तसेच उद्योगांना पाणीपुरवठा करणारे रानसई पुनाडे ही दोन्ही धरणे भरली आहेत, मात्र त्यानंतर ऑगस्ट महिन्यात पहिल्या आठवड्यात काही प्रमाणात पाऊस झाला मात्र त्यानंतर पावसाने दडी मारली.

उरण तालुक्यातील नागाव, केगाव, चाणजे व खोपटे, कोप्रोली, चिरनेर, विंधणे, रानसई, वशेणी, पूनाडे, आवरे पाले, पिरकोन, वेश्वी, गोवठणे, बोरखार आदी गावात भात शेतीचे पीक घेतले जात आहे. हे साधारण दोन हजार ५०० हेक्टरपेक्षा अधिक आहे. यातील बहुतांशी शेती ही खाडी किनाऱ्यावर आहे. पंधरा दिवस पावसाचा खंड पडला. त्यामुळे शेतातील पिके पाण्याविना करपू लागली आहेत. त्याचप्रमाणे काही ठिकाणी पिकावर करपा रोग आला आहे.

पाऊस थांबल्याने भात पिके मूळ धरू शकली नाहीत. त्यातच ढगाळ वातावण निर्माण झाल्याने पिकावर तूर्तुऱ्या रोगाचाही प्रादुर्भाव वाढू लागला असून शेतकऱ्यांची शेती हातची जाण्याची वेळ आली होती, मात्र पुन्हा एकदा पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# सायन-पनवेल महामार्गाशेजारी निवारा शेडची उभारणी

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधीमधून २० लाख रुपये खर्च करून सीबीडी बेलापूर येथील सायन-पनवेल महामार्ग शेजारी (ब्रिज खाली) बसण्याची व्यवस्था व प्रवासी निवारा शेड उभारून त्याचे लोकार्पण ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करून प्रवाशी सेवेसाठी लोकार्पण करण्यात आले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, सीबीडी परिसरातील प्रवासी याच ठिकाणाहून गावाकडे ये-जा करीत असतात. नवी मुंबई शहरातील प्रवासी विशेषतः व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी हे दैनंदिन कामानिमित्त गावी तसेच विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी ये-जा करीत असतात, परंतू या ठिकाणी प्रवासी शेड नसल्यामुळे प्रवाशांना एखादा आसरा शोधत थांबून बसची प्रतीक्षा करावी लागत होती.

या वेळी माजी भाजपा जिल्हाध्यक्ष सी.व्ही.रेड्डी, विनय गायकवाड, बंडू मोरे, हस्तीमल जैन, नानजी भाई, संजय ओबेरॉय, जयदेव ठाकूर, अंशू पालांडे, माणिक गायकवाड, जयराम पासवान, अजय वर्मा, गणेश इंदोरे, ढोरे साहेब, बागले साहेब, किशन राठोड, निलेश पाटील, जाधव, गावडे, देविका करपे, शकुंतला गावित, मनीषा जाधव, शीतल गांधी, माधुरी यामा, सारिका राठोड, विद्या सावरकर, चैताली ठाकूर, सुमन बामणकर, अलका कामत, देवयानी मुकादम, मीना ओझा आदी उपस्थित होते.



# नवी मुंबईत उद्धव ठाकरे गटाला खिंडार

## विभाग प्रमुखासह शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील उद्धव ठाकरे गटाला (उबाठा) खिंडार पडले असून शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या कार्य प्रणालीवर आणि नेतृत्वावर विश्वास ठेऊन उबाठा गटाचे वाशी, सानपार्डो शिरवणे, ने:ळ येथील उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख शाखाप्रमुख आणि महिला पदाधिकारी यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यप्रणालीने प्रभावित होऊन शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन नवी मुंबईतील शिवसेना (उबाठा) गटातील वाशी, सानपाडा, शिरवणे, नेरूळ येथील मुख्य कार्यकर्त्यांनी नेरूळ येथील जनसंपर्क कार्यालयात शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

यात शिवसेना उपशहर प्रमुख विवेक सुतार, विभाग प्रमुख जयवंत सुतार, उप विभाग प्रमुख नंदेश पाटील, शाखा प्रमुख सूर्यकांत पाटील, सुरेश जाधव, शिवसेना महिला विभाग संघटक सुजाता भोईर, शाखा संघटक सुरेखा भोईर, सारिका सुतार, वैशाली म्हात्रे, अनिता राठोड, उप विभाग प्रमुख हेमंत चोरगे, शाखा प्रमुख प्रणय तुडिलकर, रंजित घाडगे, विभाग अधिकारी युवा सेना साई माने, सुनील पाटील आणि जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवाजी खंडागळे यांनी आपल्या शेकडो समर्थक कार्यकर्त्यांसह शिवसेना पक्षात प्रवेश केला.



व्यासपीठावर सह संपर्क प्रमुख आणि माजी नगरसेवक ज्ञानेश्वर सुतार, उपजिल्हा प्रमुख दिलीप घोडेकर, उप जिल्हा प्रमुख संजय भोसले, उप जिल्हा प्रमुख संजय कपूर, शहर प्रमुख विजय माने संतोष मोरे, अरुण गुरव आदी उपस्थित होते.

# तळोजामध्ये महिलांसाठी दहीहंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आज भारतीय जनता पक्ष व गौऱ्या गणपती महिला मंडल तलोजा फेज १ मधे महिलांसाठी खास दहीहंडी लवण्यात आली.

यामध्ये महिलांच्या डोल्यावर पट्टी बांधून दंडी फोडायची होती. अनेक महिलांनी भाग घेत दहीहंडीचा आनंद घेतला. हंडी फोडणाऱ्या महिलेस पैठणी देण्यात आली. हंडीमधे सर्व धर्मीय माहिलांनी भाग घेतला. हिंदू मुस्लिम महिला एकत्र येऊन हंडीमध्ये भाग घेतला.

या कार्यक्रमाचे आयोजन भाजप नेते प्रल्हाद केणी व निर्दोष केणी व गौरा गणपती महिला मंडळ यांनी केले होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रतीक्षा प्रल्हाद केणी, आशा बोरशे, सुरेखा दिलीप केणी, सारिका केणी, प्रल्हाद केणी, निर्दोष केणी, जयवंत घरत, संतोष पाटील, संदीप बंदेकर आदी उपस्थित होते.









# उरण पिरवाडी येथे वनवासी कल्याण आश्रमातर्फे रक्षाबंधन



**उरण : बातमीदार**

उरण पिरवाडी येथे वनवासी कल्याण आश्रमाच्या वतीने रक्षाबंधन कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र तालुका उरण अध्यक्ष मनोज ठाकूर यांनी उपस्थित लहान मुलांना चालू घडामोडीत लहान मूल मुलींवर बलात्काराच्या घटना संदर्भात, तसेच महिलांवर होत असलेल्या अत्याचार, विनयभंग यातून बचावासाठी कसे स्वतः ला वाचवावे तसेच लहान मुलं मुलींना चांगला स्पर्श वाईट स्पर्श या विषयी माहिती दिली आणि कुणी वाईट स्पर्श केला तर स्वतः स्वतः चे रक्षण कसे करावे हे सांगितले.

वनवासी कल्याण अश्राम जिल्हा हित्रक्षा प्रमुख मीरा पाटील यांनी वनवासी कल्याण आश्रम सांस्कृतिक जोड समाजातील सर्व घटकांना सोबत राहण्यासाठी रक्षाबंधन सण साजरा करीत असून रक्षाबंधन सण का साजरा केली जाते याची थोडक्यात माहिती सांगितली. नंतर मुलांना व मोठ्या माणसांना राख्या बांधून बिस्कीट वाटप केले. सहसचिव कुणाल शिशोदिया यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

या वेळी बेबीताई कातकरी, हरेश कातकरी आदी उपस्थित होते.

# बेलापूर येथे महारोजगार मेळावा

**नवी मुंबई : बातमीदार**

बेरोजगार युवक, युवतींना त्यांच्या स्वप्नातील रोजगार प्राप्त करून देणारा विनामूल्य महारोजगार मेळावा संदीप नाईक प्रतिष्ठानच्या सौजन्याने शुक्रवारी (दि. ३०) सकाळी ९ वाजता वारकरी भवन, वायएमसीए मार्ग, सेक्टर ४ सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे.

या महारोजगार मेळाव्यामध्ये विविध क्षेत्रातील ५० कंपन्या सहभागी होणार असून त्यामधून पाच हजारांपेक्षा अधिक रोजगार आणि स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत. आतापर्यंत नऊ यशस्वी महारोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले असून यंदाचा हा दहावा महारोजगार मेळावा आहे. या महारोजगार मेळाव्यामध्ये नवी मुंबई आणि मुंबईमधील बँकिंग, बॅक ऑफिस, बीपीओ, विमानतळ, माझगाव डॉक, पेशंट केअर, आयटी, आयटीआय, इत्यादी क्षेत्रातील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत.

माजी सैनिक आणि निवृत्त पोलिसांसाठी रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत तर कॉलेज विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी इंटर्नशिपच्या संधी आहेत.

# पनवेलच्या प्रभु आळीमध्ये पारंपरिक पध्दतीने श्रीकृष्ण जन्मोत्सव

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेलच्या पुरातन लक्ष्मी - नारायण मंदिरात १०३ वर्षांची परंपरा जपून श्रीकृष्ण जन्मोत्सव पारंपारिक पध्दतीने शाडूच्या मूर्तिची प्रतिष्ठापना करून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.



पनवेलच्या प्रभू आळीतील सीकेपी समाजाच्या १५० वर्षांपेक्षा जुन्या लक्ष्मी-नारायण मंदिरातील श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे हे १०३वे वर्षे असून येथील वैशिष्ट्य म्हणजे येथे मंदिरात शाडूच्या श्रीकृष्णाच्या मूर्तिची प्रतिष्ठापना केली जाते. पनवेलमधील कुंभार आळीतील धर्मा गणपत कुंभार यांच्या कुटुंबाकडूनच आणली जात आहे. यावर्षी मूर्तिची विधिवत प्रतिष्ठापना सोमवारी सायंकाळी संस्थेचे विश्वस्त मिलिंद देशपांडे व त्यांचा पत्नीचे हस्ते करण्यात आली. रात्री १२ वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला. गौरी राजे, मिनल टिपणीस, स्नेहा दिघे, नीलिमा वैद्य, श्वेता कर्णिक, अश्विनी देशमुख, वंदना लिखिते, श्रीमती रोहिणी देशपांडे व श्रद्धा कुळकर्णी यांनी भजन व पाळणा म्हटला त्यानंतर सुंठवडा आणि आणलेला प्रसाद उपस्थितांना वाटण्यात आला.

कालाष्टमीला मंदिरात दोन हंड्या बांधण्यात येतात त्यापैकी एक हंडी फोडण्याचा मान प्रभू आळीचा आहे. सायंकाळी महाप्रसाद होतो. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष योगेश राजे, सचिव गिरीश गडकरी, संदीप देशमुख, श्रीकृष्ण चित्रे, महेश कर्णीक, अनिल गडकरी, श्रीनिवास कुळकर्णी, क्रांतीकुमार कुळकर्णी, राहुल देशपांडे, योगेश शृंगारपुरे,शैलेश शृंगारपुरे, आशिष चौबळ व महिला मंडळाने विशेष मेहनत घेतली.

# उमेश चौधरी यांचे वाराणसीमध्ये गायन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप पनवेल तालुका सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष पं. उमेश चौधरी यांनी वाराणसी मध्ये झालेल्या 'सुबह- ए-बनारस' गायन समारंभात रसिकांना मंत्रमुग्ध केले. विशेष म्हणजे 'असी घाट-काशी विश्वनाथ' येथे गायन करण्याचा सन्मान या रायगडच्या सुपुत्राला मिळाले.

उमेश चौधरी यांनी राग 'ललित' मधील तीन ताल बंदिश द्वारे 'पियू पीयू रटत पपीहरा बोले', पुढे राग 'कोमल रिषभ आसावरी मधून 'मैं तो तुम्हरो दास जनम जनम से'त्यांनतर बोल आहेत 'काहे करत मोसे'खमाज रागांतील ठुमरी आणि समारोप राग भैरवीतून 'चलो मन काशी' या भजनातून झाली. त्यांना तबला साथ पंकज राय तर संवादिनी आनंद किशोर मिश्रा यांनी दिली.

या वेळी अत्यंत सुश्राव्य आणि मनमोहक अशा गायनाने पहाटचे वातावरण प्रफुल्लीत झाले होते. नेहमीच आपल्या गायन शैलीने प्रभावित करणाऱ्या पं. उमेश चौधरी यांनी या समारंभातही आपल्या कलेतून रसिकांकडून वाहवा मिळवली. त्यांना रामानंद तिवारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

विशेष म्हणजे त्याचदिवशी पं. उमेश चौधरी यांचा वाढदिवसही होता. हा योग जुळून आल्याने यावेळी संगीत क्षेत्रातील दिग्गजांनी त्यांचे अभिष्टचिंतन करत त्यांच्यावर त्यांना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.



राम प्रहर

## श्रावणधारा

### वर्षा ऋतू

काळे निळे मेघ जमले आकाशी
तडीत साधते संवाद मानवाशी
सुटला सोसाट्याचा थंडगार वारा
घेऊन आला पावसाच्या धारा ।।१।।

संकेत मिळाला ग्रीष्म ऋतू संपला
आरंभ झाला वर्षा ऋतूला
बरसती नभातुनी मृगाच्या जलधारा
मातीचा सुगंध जगी दरवळला ।।२।।

धरती न्हाऊन निघाली जलधाराने
आनंदाने हरणे सुखावली पाडसे बागडली
दस दिशात थंडगार गारवा भरला ।।३।।

धनारे तुमारे उगवले भराभर
लता वेली डोलती वाऱ्यावर
झाडे झुडपे झाली हिरवीगार
वसुंधरा नेसली जरी काठी हिरवा शालू ।।४।।

नदी नाल्यांना आले महापूर
बारव विहिरी भरल्या भराभर
आणि बळ आले शेतकऱ्यांना
नव्या जोमाने लागले शेतीच्या कामाला ।।५।।



-नागनाथ डोलारे,
पनवेल

# माथेरानमध्ये वाऱ्यासह जोरदार पाऊस

## वीजपुरवठा खंडित; स्थानिक, पर्यटकांची गैरसोय

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी दडी मारलेल्या पावसाने आता जोरदार हजेरी लावली असून वारा आणि पाऊस यामुळे शहराचा विद्युत पुरवठा खंडित झाला. त्यामुळे येथे नागरिकांना आणि पर्यटकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

मागील काही दिवसांपासून उसंत घेतलेल्या पावसाने जोरदार पुनरागमन केले असून चार दिवसांपासून येथे डोंगरमाथ्यावर सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार सरी बरसत आहेत. चार दिवसांत ३०० मिमी पाऊस माथेरान शहरात पडला आहे. सोमवारी सकाळी ८ वाजेपर्यंत ४७९४.८ मिमी पावसाची नोंद येथे करण्यात आली आहे. याचबरोबर रविवारी सायंकाळी ६ वा.पासून माथेरान शहराचा विद्युत पुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे येथील स्थानिक नागरिकांसह



पर्यटकांनासुद्धा त्रासाला सामोरे जावे लागत होते.

सोमवारी थोड्या वेळासाठी विद्युत पुरवठा सुरू झाला होता, मात्र लागलीच बंद करण्यात आला. दुपारी ३ वाजता शहराचा विद्युत पुरवठा सुरळीत झाला. १८ ते २० तास विद्युत पुरवठा बंद झाल्याने सर्व मोबाईल नेटवर्क, ऑनलाईन व्यवहार बंद झाल्याने येथील हॉटेल आणि लॉजधारक तसेच दुकानदार व्यवसायिकांना मोठ्या त्रासाला येथे सामोरे जावे लागत होते.

**आम्ही माथेरानमध्ये आलो असता येथील वारा, पाऊस खूपच थरारक आहे. धुक्यात हरवलेले माथेरान खूपच आल्हाददायक आहे. आम्ही रविवारी सायंकाळी येथे दाखल झालो तेव्हापासून येथील वीजपुरवठा खंडित झाला होता. आम्ही बाजारपेठेत भटकंतीसाठी जाणार होतो, मात्र लाईट नसल्याने जाऊ शकलो नाही.**

**–विनीत सावन**, पर्यटक, सुरत

**माझे ज्यूट बॅगचे दुकान असून सध्या पावसाळी पर्यटन चांगले बहरले आहे, मात्र लाईट जाण्याचे प्रमाण वाढतच असून रविवारी संध्याकाळी गेलेली लाईट सोमवारी दुपारी ३ वाजता आली. त्यामुळे रविवारच्या व्यवसायावर मोठा परिणाम झाला. नेटवर्क नसल्याने अधिकारी वर्गाशी संपर्क होऊ शकला नाही.**

**–पवन गडवीर**, दुकानदार

# निवडक

## विवा कॉलेजमध्ये दहीहंडी उत्सव



**माणगाव** : विवा कॉलेजमध्ये दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या उत्सवाला नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, शर्मिला सत्वे, खांदाड गावाचे पोलीस पाटील नथुराम पोवार, माजी ग्रामपंचायत सदस्य काशीराम पोवार, सुमित काळे, बाळा मांजरे, सीताराम भोनकर, कृष्णा दिवेकर, गणेश दूरकर, विठोबा पालकर, राकेश पवार, समीर जाधव, रुपेश बोडेरे, वैभव पवार, गणेश भोसले, नामदेव खराडे, धनंजय खैरे, महेश पवार आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दहीहंडी उत्सवाचे संयोजक म्हणून साईनगर मित्रमंडळ माणगाव व विवा कॉलेज यांनी काम पहिले.

## बुद्धीबळ स्पर्धेत गणराज बाणकोटकर प्रथम



**मुरूड** : तालुका पावसाळी स्पर्धेत बुद्धिबळ स्पर्धा साळाव येथील जिंदाल हायस्कूल येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूल येथील गणराज हरिदास बाणकोटकर याने १९ वर्षीय वयोगटात तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. १७ वर्षे वयोगटात आर्या पाटील हिने प्रथम क्रमांक तसेच नुपूर जमनु याने १४ वर्षे वयोगटात तिसरा क्रमांक पटकावला. स्वराज वाडकर याने १७ वर्षे वयोगटात पाचवा क्रमांक पटकावला. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन शाळेचे चेरमन फैरोज घलटे, सर्व संचालक, मुख्याध्यापक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, दत्ता खुळपे, सागर राऊत व मिलिंद मोहिते यांनी अभिनंदन केले.

## राखी बांधून मुख्यमंत्र्यांचे स्वागत

**पाली** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई–गोवा महामार्गाच्या कामाचा आढावा घेतला. या वेळी बेणसे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हातात राखी बांधून अनोख्या पद्धतीने स्वागत केले. मुख्यमंत्र्यांनी राखी बांधणाऱ्या बहिणींचा सन्मान राखत आत्मियतेने विचारपूस केली. या वेळी आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख उद्धव कुथे, कामगार नेते अरुण कुथे, बेणसे शिहू विभाग प्रमुख राजेश गोरे, बेनसे तंटामुक्त अध्यक्ष मुजीप मोमीन, नंदकुमार कुथे, शरद अडसुळे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.



# मुरूड मच्छीमार्केटजवळील रस्ता खड्डेमय ; नागरिक त्रस्त

**मुरूड : प्रतिनिधी**



मुरूड मच्छीमार्केटजवळील रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे खड्डे पडून तलावाचे स्वरूप आले आहे. या खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

परेश हॉटेलपासून एकदरा पुलापर्यंतचा रस्ता पावसाळ्याच्या आधी बनवणे क्रमप्राप्त होते, परंतु ठेकेदाराने या रस्त्याकडे दुर्लक्ष केल्याने नागरिकांना खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. या रस्ताकरिता निधी मंजूर केला आहे. रस्त्याचा कामाच्या ठेका ही देण्यात आला होता, परंतु ठेकेदाराकडून हा रस्ता नव्याने बनविण्यात आला नाही व पडलेले खड्डेही न बुजविल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. हा उत्सव घरोघरी घरी उत्साहात साजरा केला जातो. गेले सहा दिवस पावासानी विश्रांती घेतली होती, परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग व ठेकेदाराकडून खड्डे बुजविण्यास सुरुवात होत नसल्याने नागरिकांनी नाराजी दर्शवली आहे. सागरकन्या मच्छीमार सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले यांना विचारणा केली असता, निधी येऊनही रस्ता बनत नसेल तर हे दुर्दैव आहे. काही दिवसांवर घरोघरी गणपती उत्सव साजरा केला जातो. याच रस्त्यावरून गणपतीचे आगमन होत असते, परंतु रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांतून वाहन चालवणे कठीण झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्याकडे दुर्लक्ष न करता किमान रस्त्यावरचे खड्डे बुजवून गणेशभक्तांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे.

# मुख्यमंत्र्यांकडून कशेडी घाट भुयारी मार्गाची पाहणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पनवेल ते पळस्पे आणि पुढे रायगड जिल्ह्याचे शेवटचे टोक असलेले कशेडी घाटातील भुयारी मार्ग येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि.२६) सायंकाळी उशिरा पाहणी केली.

तालुक्यातील कातळी भोगाव येथील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गाचा वापर करून चाकरमानी आगामी गणेशोत्सवात कोकणाकडे रवाना होणार आहेत. मुंबई–गोवा महामार्गाचे सर्वाधिक अपूर्ण काम हे रायगड जिल्ह्यात असून त्यापुढे रत्नागिरी जिल्ह्यातील परशुराम घाट आणि चिपळूण तसेच हातखंबा या ठिकाणी वाहतुकीस योग्य रस्ता नसल्याचे दिसून येत आहे. हे अपूर्ण काम संपूर्ण कोकणवासियांची डोकेदुखी ठरली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अपूर्ण कामाची माहिती घेण्यासाठी महामार्गावरून पाहणी दौरा करीत रायगड आणि रत्नागिरीच्या सीमेपर्यंत गेले. त्यांच्यासोबत महाडचे आमदार भरत गोगावले उपस्थित होते.





**अलिबाग : तालुक्यातील श्रीगाव येथे तीन थरांची दहीहंडी फोडताना बालगोपाळ.** (छाया : सचिन पाटील)

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने माथेरान पोलिसांचे मार्गदर्शन

**माथेरान : प्रतिनिधी**



माथेरानमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांनी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी माथेरानमधील शाळांमध्ये भेट देऊन विद्यार्थ्यांस मार्गदर्शन केले.

बदलापूर घटनेमुळे येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांनी सोमवारी (दि.२६) वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेत जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अहिरे, शिक्षक लक्ष्मण ढेबे, साक्षी कदम, मनीषा चौधरी, निकिता चव्हाण, अमोल अंधारे उपस्थित होते. मुलींच्या सुरक्षेकरिता शासनाच्या परिपत्रकानुसार उपाययोजना कराव्या, मुलींकडे शिक्षकांनी नियमितपणे विचारणा करावी, शाळेच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे. स्वच्छतागृह नियमित तपासावे व ते स्वच्छ राहतील याची काळजी घ्यावी, मुलांना घेऊन येणारे वाहनचालकांची संपूर्ण माहिती घेणे व त्यांना मुलांच्या सुरक्षेविषयक सूचना कराव्या तसेच पहिली ते सातवीचे विद्यार्थ्यांसोबत मैत्रीपूर्ण गप्पा मारून गुड टच, बॅड टच, अनोळखी व्यक्तीकडून काही घेऊ नये, त्यांच्यासोबत कोठेही जाऊ नये, नेहमी पालकांसोबत शाळेत यावे, असे सांगितले.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सध्या पावसाळी पर्यटन हंगाम सुरू असल्याने मोठ्या संख्येने पर्यटक रायगडात दाखल झाले आहेत. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि.२६) २८ वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १८४ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख ५३ हजार रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# रिसमध्ये मुलाची वडिलांना लोखंडी रॉडने मारहाण

**खोपोली : प्रतिनिधी**

वडिलांनी रागावून हाताने थोडे मारले म्हणून चिडलेल्या १९ वर्षीय मुलाने वडिलांना शिवीगाळ करीत लोखंडी रॉडने मारून जखमी केल्याची घटना तालुक्यातील रिस गावात घडली आहे. या मुलाविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

रिस गावात राहणारे शिवदिपसिंग भजनसिंग (वय ४७, रा. रिस, खालापूर) रविवारी सायं. ४ वा.चे सुमारास त्यांचे वडिलांना घेऊन पनवेलला जाण्यास निघाले होते. त्या वेळी शिवदिपसिंग यांचा मुलगा मनज्योत याने घराची चावी मागितली. शिवदिपसिंग यांनी घराची चावी देण्यास नकार दिला म्हणून मनज्योत याने आजोबांना शिवीगाळ केली. त्या वेळी शिवदिपसिंग यांनी, अरे ते म्हातारे आहेत, त्यांना शिव्या का देतोस?’असे बोलून मनज्योत यास हाताने थोडे मारले. त्याचा राग मनात धरून मनज्योत याने लोखंडी रॉडने वडील शिवदिपसिंग यांच्या पाठीत मारहाण करून शिवीगाळ केली.

जखमी शिवदिपसिंग यांनी मुलगा मनज्योतविरूद्ध रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली मपोना एस. पाटील करीत आहेत.

# रोह्यात शिवरायांच्या पुतळ्याची भव्य मिरवणूक

## खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरेंचा सहभाग

**रोहे : प्रतिनिधी**

ढोल–ताशा, खालु–बाजासह पारंपरिक वाद्यवृंदावर महाराष्ट्राचे आराध्यदैवत राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची रोहा शहरातून भव्य मिरवणूक सोमवारी (दि.२६) सायंकाळी काढण्यात आली. संपूर्ण रोहा शहर भगव्या झेंड्याने सजले होते. भगवे फेटे, पारंपरिक वेशभूषा करून नागरिक व विद्यार्थी या मिरवणुकीत उत्साहात सहभागी झाले होते. त्यांच्यासह खासदार सुनील तटकरे, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे सहभागी झाले होते.

या वेळी माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, रत्नप्रभा काफरे, लालता प्रसाद कुशवाह, मुख्याधिकारी पंकज भुसे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, राष्ट्रवादी जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर, शिवप्रेमी मकरंद बारटक्के, शहराध्यक्ष अमित उकडे, शहराध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, भाजप शहराध्यक्ष यज्ञेश भांड, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलाटकर, महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, काशिनाथ धाटावकर, अहमद दर्जी, समीर सकपाळ, जितेंद्र पडवळ, नवनीत डोलकर, उत्तम नाईक, सुखद राणे, रवी चाळके, चंद्रकांत पार्टे, मानसी दाते, पार्टे, स्वरांजली शिर्के आदी उपस्थित होते.

नवरत्न हॉटेल येथून निघालेली ही मिरवणूक दमखाडी, रोहा अष्टमी नगरपरिषद चौक, रोहा एसटी स्टँड ते तीनबत्ती नाका या दरम्यान ही मिरवणूक काढण्यात आली. महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनीही फुगडीचा आनंद घेतला. रोहा अष्टमी नगर परिषदेच्या चौकात चलचित्र व पोवाड्याचे आयोजन करण्यात आले होते. पुणे येथील मूर्तीकार महेंद्र थोपटे यांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्वात उंच पुतळा साकारला आहे. या पुतळ्याचे रोहा शहरातील कुंडलिका नदी संवर्धन येथे साकारण्यात येत असलेल्या शिवसृष्टीत बसवण्यात येणार आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे पूर्णाकृती पुतळा लवकरच रोह्यातील कुंडलिका नदी संवर्धन येतील शिवसृष्टीमध्ये बसविण्यात येणार आहे. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज व रोहेकर नागरिक यांच्या साक्षीने नागरिकांसाठी लोकार्पण करण्यात येणार आहे व ऐतिहासिक पुतळ्याचे अनावरण होणार आहे. त्या वेळीही रोहेकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व आपल्या लाडक्या राजाला मानवंदना द्यावी.**

**– खासदार सुनील तटकरे**





























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com